
७
म अंक
माणूस
जून १९६७
चाळीस पैसे

वर्षारंभदिनाची

सहर्ष घोषणा

• •

नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

• •

राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

• •

सप्रेम भेट योजना . . .

पहा : कव्हर पान तीन

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : पहिला
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
**संपादक**
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

---

▫ **अभिराष्ट्रेण वर्धताम् . .**

– खूप ज्ञान मिळवावे, पुष्कळ विद्या शिकावी, अशी भूक सध्या येथील जनतेत निर्माण झालेली आहे. ही नैसर्गिक गरज पुरी करावी या उद्देशाने ' माणूस ' सर्वांसमोर येत आहे.

– जबाबदारवृत्तीने कारभार करणारा एक सुसंस्कृत नागरीक या विद्येतून व शिक्षणातून तयार झाला तरच तो नव्या काळाचे नेतृत्व योग्य तऱ्हेने करू शकणार आहे. ' अभिराष्ट्रेण वर्धताम् ' हे वेदवचन यासाठीच ' माणूस 'ने आपले ध्येयवाक्य म्हणून निवडले आहे. ' समाजासहित आपली उन्नती साधा ' असा या वचनाचा अर्थ आहे. व्यक्तिहितावरोबरच सामाजिक जबाबदारीची प्रेरणाही यात अंतर्भूत आहे.

– अशा तऱ्हेच्या विचारसरणीतूनच एक समन्वयी, सुसंवादी व स्वाभिमानी जीवन जगणारा मनुष्य तयार होत असतो. असा मनुष्यच एका सहिष्णू, उदार व मानवी संस्कृतीची निर्मिती करू शकतो. फार पूर्वीपासून या देशाने हे आदर्श आपल्यासमोर ठेवलेले आहेत. नवभारताच्या उभारणीच्या काळात या आदर्शांचा विसर पडू नये, यासाठीच ' माणूस ' हे नामकरण.

**' माणूस '– प्रारंभिक निवेदन : जून १९६१**

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

**४१९ नारायण, पुणे २.** **दूरध्वनी : ५७३५९** **मूल्य ४० पैसे**



## पत्रमैत्री

स. न. मे २०

मी 'माणूस'चा नियमित वाचक आहे आणि निदान दहा जणांस तरी 'माणूस'चे नियमित वाचक (विकत घेऊन) बनविले आहे. तसेच अनेक मित्रांस 'स्मोकर्स कॉर्नर'कडे न नेता बुकस्टॉलकडे नेऊन 'धूम्रपानाऐवजी वाचन' ह्या आपल्या मताचाही मी यथाशक्ती प्रसार करीत आहे. 'माणूस'ची किंमत तशी वाजवी आहे. पण आपण जेव्हा नाइलाजास्तव 'माणूसची किंमत' पावलीवरून प्रथम पुढे नेलीत तेव्हा काही मित्र म्हणाले, 'हा हन्त हन्त पावली...' दि. २२ एप्रिलच्या अंकावर (लता मंगेशकर विशेषांक) ६० पैसे पाहून सर्वांनी बहिष्कार टाकला, (मी वगळून) पण पुढच्या गुरुवारी पुन्हा स्टॉलवर जाऊन सवयीप्रमाणे चौकशी केली—गाडी पुन्हा रुळावर होती.

"कृपा करून 'माणूस'ने पन्नासाच्या आतच राहावे, नाहीतर तो वाचनालयात जाऊन वाचावा लागेल," हे काही वाचक मित्रांचे विचार त्यांच्या आग्रहास्तव आपणांस कळवीत आहे. आज खेडोपाडीही लोकांना जाहिराती पाहण्या-वाचण्याची सवय जडलेली आहे. तेव्हा 'माणूस'मध्ये जाहिराती आल्यास असह्य का व्हावे? "हा हन्त हन्त अधेली..." म्हणण्याची पाळी यऊ नये.

आसाम वार्तालेख आवडला. बिहार दुष्काळग्रस्तांच्या दुःसह जीवनाचे दर्शन घडविल्याबद्दल आभारी आहे. ठाणे जिल्ह्यातील सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतील आदिवासीही दुष्काळाच्या व ख्रिस्तीकरणाच्या दाट छायेत आहेत. त्यांच्याही जीवनाचे सविस्तर दर्शन घडविल्यास फार बरे होईल.

काही मित्रांनी 'माणूस' हिंदीतून प्रकाशित व्हावे अशीही सूचना केली आहे. किंमतीच्या प्रश्नासही त्यामुळे हातभार लागू शकेल व नवीन योजनाही आखणे सोयीचे होईल.

फार अल्पकाळात 'माणूस'ने मराठी वाचकांत निर्माण केलेला जिव्हाळा लक्षात घेऊन हे पत्र लिहिण्याचे धाडस केले.

**रमाकान्त बाळाराम पाटील,**
मालाड, मुंबई.

स. न. मे २२

१. माणूस साप्ताहिकाचा मी एक वाचक आहे. आपला साप्ताहिक 'माणूस' हा आकाराने माणूस न वाटता पोरकट वाटतो. त्याचा आकार ८" × ५॥" आहे तो बदलून जर त्याचा आकार ८" × ११" करता आला तर 'माणसा'ला शोभून दिसेल. हे करीत असता पानांची मर्यादा सध्या जी ६४ आहे ती ३२ येईल.

२. 'माणसा'त येणारे लेख समग्र असतातच पण त्यांत जागतिक (भारताशी,

संबंधित) राजकारणविषयक लेख अवश्य असावेत. कारण आपली भूक आता भारतापलीकडे गेली आहे.

३. मध्यमवर्गाचे प्रश्न व समस्या यांचा उकल सध्या आवश्यक आहे. त्याबाबत लेख आम्हां मध्यमवर्गांना हवेत

४. प्रादेशिक-शैक्षणिक गाऱ्हाणी वेशीवर टांगली पाहिजेत.

५. श्री. फडणीसांची एक-दोन अर्थवाहक चित्रे यांचा समावेश मधून मधून पाहिजे. ती देण्याचा यत्न अवश्य करावा.

**वा. शं. हाते, मेडशी.**

**स. न.** **मे २४**

आपले चि. बाळ 'माणूस' लवकरच ७ व्या वर्षात पदार्पण करणार. तेव्हा आमच्या त्याला शुभेच्छा. हल्ली 'माणूस'चा दरारा मात्र चांगलाच कमी झाला आहे. म्हणजेच 'माणूस'ची इतर मासिकांपासून वेगळेपणाची जाणीव नष्ट होऊ लागली आहे.

बिहारची व आसामची वार्तापत्रे आवडली. व्यंगचित्रकार फडणीसांची मुखपृष्ठावरील व्यंगचित्रे चालू घडामोडीला अनुसरून व सूचक असतात. आपले 'उर्दूवार्ता' हे सदर आवडत नाही.

**अनिल वि. अभ्यंकर, मुंबई.**

**स. न.** मे २४

आपला 'माणूस'चा दि. २० मे ६७ चा अंक वाचला. विशेषत: श्री. विद्याधर भागवत यांची "आभाळ ओथंबून आलं होतं" ही कथा फारच उत्तम आहे. मात्र एक गोष्ट खटकली. वरील कथेत पान २४ वर किशोरी, सरांना सुलोचना ही शाळेच्या सेक्रेटरींची मुलगी असल्याचे सांगते व पान २६ वर मोघे सर सुलोचनाला रागाने बोलताना "तू सेक्रेटरीची बहीण असलीस तरी..." असे बोलून जातात. तेव्हा सुलोचना सेक्रेटरीची मुलगी की बहीण असा प्रश्न पडतो. म्हटले तर हा कच्चा दुवा आहे. लेखनाच्या ओघात असे होणे अपरिहार्य आहे. पण आपल्या सर्वांगसुंदर अशा साप्ताहिकात चूक अक्षम्यच ठरेल नाही?

असो. बाकी अंक फारच उत्तम आहे ह्या अंकाला हातभार लावलेल्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

**सतीशचंद्र कुलकर्णी, तासगाव.**

**स. न.** **मे २४**

आपला २०–५–६७ चा अंक वाचला. फारच आनंद झाला. विद्याधर भागवतांची कथा फार आवडली. शेवटचे दोन वार्तालेख वाचून परिस्थितीबद्दल बरीच कल्पना आली. 'कोंडुरा'चे परीक्षण, 'भिंतीच्या तुंबड्या' मधील काव्याचा पेग व कुत्र्याचे नैतिक जिणे विशेष आवडले.

-आणि हिदायत खानांचे चित्रपट परीक्षण पण फारच सुटसुटीत शब्दांत होते.

एकंदरीत अंक वाचून मनोमन आनंद झाला.

**फिलीप पाटोळे,**
जालना

# मार्ग

— श्री.ग.मा.

खोपट, ट्रान्झिस्टर, लक्तरे, घड्याळ, निवडणुका, शिक्षण...... चित्रात कुठलाच सलगपणा जाणवत नव्हता. येथे समृद्धीची आयात दिसत होती, पण ती चिकटवल्यासारखी, उपरी वाटत होती. शिक्षण होते पण त्याचा घरादारावर, वातावरणावर प्रभाव नव्हता. राहणीमानातील वाढ दाखविणारी काही नवीन ठिगळे जुन्या लक्तरांवर लोंबत होती एवढेच. कुठेही आंतरिक सूत्र नव्हते, आतला आणि बाहेरचा मेळ नव्हता. समान पृष्ठभूमी नव्हती. एखाद्या ढासळणाऱ्या ऐतिहासिक बुरुजाला सिमेंट कॉंक्रीटचा पिलर आधार म्हणून उभा राहावा, पवित्र गाभाऱ्यांत विजेच्या ट्यूबने डोळे दिपावेत, 'सा' नीट जमला नसतानाच कुणी इकडून तिकडून ऐकलेले तानपलटे गळ्यातून काढीत राहावेत-तसा हा स्वातंत्र्या-नंतरचा सारा विकास त्या तीन खोपटांच्या वस्तीत, त्या चांदण्या रात्री मला भेडसावीत होता. विकासाचे हे बेगडी आणि अनुकरणग्रस्त स्वरूप मला अस्वस्थ करीत होते. हा बेगडीपणा, ही भ्रष्टता आमच्यात कुणी आणली ? याला जबाबदार आम्ही सुशिक्षितच नाही काय ? आमचे समाजातील कार्य काय ? आमच्या अस्तित्वाचा अर्थ कोणता ? चार कथा–कादंबऱ्या–नाटके लिहून लोकांची करमणूक करणे, ज्ञानाच्या नावा-खाली शाळाकॉलेजांतून, वृत्तपत्रांतून, पाठ्यपुस्तकांतून माहिती पुरविणे, गाईडे लिहून, क्लास काढून शिक्षणाचे कारखाने चालविणे एवढेच आमचे इतिकर्तव्य ? शरीराच्या निरनिराळ्या हालचालींत एकसूत्रीपणा आणणे हे जसे मेंदूचे कार्य, मज्जातंतूंच्या व्यापारात संगती निर्माण करणे हे जसे बुद्धीचे कार्य आणि शरीर–मन–बुद्धी यांच्या चलनवलना-मध्ये मेळ साधून, वादी आणि संवादी सुरांच्या साहाय्याने जीवनाच्या संगतीकरणाची संगीत-साधना साधत राहणे हे जसे अंतरात्म्याचे कार्य तशी सामाजिक शरीरधारणेची काही व्यवस्था नको काय ? ओघानेच अशा व्यवस्थेत संगतीकरणाची, अन्वयार्थ लावण्याची, कार्याकार्य निश्चित करण्याची, समतोल वैचारिक पार्श्वभूमी निर्माण करण्याची जबाबदारी समाजातील बुद्धिजीवी वर्गाकडे येते. पण गेल्या सतरा वर्षांत आमच्या-पैकी काहीजण फुटकळ विचारविनिमयावर संतुष्ट राहिले, बहुसंख्येने उदासीनतेचा वा सुखासीनतेचा मार्ग पत्करला. गरज होती मुळापासून

हादरण्याची, हलण्याची. एका समग्र आचारविचारदर्शनाची. एक ग्रामदान आंदोलनाचा अपवाद सोडला तर स्वातंत्र्यानंतर हे तत्त्वजिज्ञासेचे आणि कर्तव्याकर्तव्याचे थैमान आमच्यात निर्माणच झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. विनोबांच्या व सर्वोदय सांप्रदायिकांच्या अव्यवहारी आणि अशास्त्रीय मांडणीमुळे आम्ही सुशिक्षित त्या आंदोलनापासून दूर राहिलो आणि नेहरूंच्या लोकशाही समाजवादाचे वरवर गोडवे गात राहण्यापलीकडे आमच्या ध्येयवादाच्या अपेक्षा आणि कक्षा वाढविण्याची आम्हांला कधीच गरज भासली नाही. सरकारी यंत्रणेने सतरा वर्षांच्या समाजवादी वाटचालीत देशातील मलेरियाचे जसे निर्मूलन केले तसे आम्ही सुशिक्षितांनी फार तर एवढे जरूर केले, की शाळा–कॉलेजांचा व वृत्तपत्र–पुस्तकांचा प्रसार वाढवून ज्ञानाच्या गोणी शहरांतून खेड्यांपर्यंत वाहून नेल्या. तेथल्या बऱ्याचशा आळशी आणि निरुद्योगी समाजाला तशी फारशी गरज नसताना करमणुकीची व छानछोकीपणाची चटक लावली. समाज बऱ्याच प्रमाणात साक्षर केला, सज्ञान आणि सुसंस्कृत नाही. परिषदा आणि परिसंवाद भरवून शुष्क काथ्याकूट केला, विद्वत्तेचे प्रदर्शन मांडले, शिफारशींचे आणि अहवालांचे ढीग रचले; पण जिवंत विचार आणि प्रामाणिक आचार लोकांसमोर ठेवला नाही. करमणूक केली, माहिती पुरवली; विवेकाचे खडे बोल ऐकवले नाहीत. ज्या काळात एखादा रामदास आणि शिवाजी जन्मास यायचा त्या काळात थिल्लर तमासगिरांच्या, शुष्क शास्त्रीपंडितांच्या आणि शून्य बाजीरावांच्या पलटणी येथे उभ्या राहिल्या.

होय ! पेशवाईची अखेर आणि आजचा काळ यांत खूपच साम्य आहे. उभी मराठी दौलत इंग्रजांच्या घशात जात असता एका शब्दाने कुणी ब्राह्मणपंडिताने समाजाला जाग आणली नाही. कुचाळक्या करण्यात, अनुष्ठानांची आणि होमहवनांची प्रदर्शने मांडण्यात येथले पांडित्य गढून गेले होते आणि येथील कलावंतांची प्रतिभा बावनखणीतील बाजीरावांच्या रंजनात गुरफटून राहिली होती. 'इंग्रज समुद्रातून येतो' यापलीकडे 'भले बुद्धीचे सागर' असलेल्या नाना फडणीसांचे भूगोलाचे ज्ञान जाऊ शकत नव्हते आणि गोऱ्यांचे राज्य कलियुगात अटळ असल्याची शिकवण खुद्द पेशव्यांना लहानपणापासून दिली जात होती.

इंग्रज सत्तेची मर्मस्थाने हुडकून, ती हस्तगत करून आपल्या समाजाची प्रतिकारशक्ती व संघटित सामर्थ्यं यांची नवी मांडणी करण्याची पुसटती जाणीवही त्या काळात निर्माण झालेली दिसत नाही. तोंड फाटेपर्यंत नव्या राजकर्त्यांचे स्तुतिपाठ गाणे, त्यांच्या शिस्तप्रियतेचे कोडकौतुक करणे, त्यांच्या शास्त्रीय शोध-बुद्धीमुळे चकित होणे ही त्या वेळच्या सुशिक्षित शास्त्रीपंडितांची कामे होती.- इंग्रजांनी आणलेल्या कायद्याच्या राज्यामुळे, चार सुधारणांमुळे हा सारा समाजच भारून गेला होता, दिपून गेला होता, बावरला होता, बावचळला होता. लाचारी, गुलामी, सुखासीन ा, लांगूलचालनाची वृत्ती प्रथम या सुशिक्षित वर्गाने धारण केली आणि इतरेजनांनी नंतर तिचे अनुकरण केले.

आज दुसरे काय चालू आहे ? रशिया–अमेरिकेकडे डोळे लावून बसलेला, या प्रगत देशांतील शास्त्रीय प्रगतीमुळे भारून गेलेला, या देशांतील ज्ञानविज्ञानावर व कलासाहित्यावर निर्वाह करणारा, या देशात शिक्षणासाठी आपली मुले लहानपणापासून पाठवून त्यांना कायमचे गुलाम बनविण्यास उत्सुक असलेला, राहणीमान वाढविण्याच्या आदर्शांमुळे झपाटून जाऊन कोणतीही बौद्धिक प्रतारणा करण्यास संकोच न बाळगणारा; परदेशप्रवासात जीवनाची इतिकर्तव्यता मानणारा, परकीय मदतीवर येथल्या विकासाचा डोलारा उभा करून देश स्वयंपूर्ण करू पाहण्याच्या अज्ञानाला अर्थशास्त्र समजणारा, श्रीमंत देशांनी आपली पकड आणि वर्चस्व कायम राखण्यासाठी सुरू केलेल्या अनेक सांस्कृतिक देवाणघेवाणींच्या कार्यक्रमांत स्वतःस गुंतवून, गुरफटवून घेऊन ' मानवी स्वातंत्र्या 'वर भरल्यापोटी प्रवचन झोडणारा, भ्रष्ट आणि चारित्र्यशून्य राजकर्त्यांच्या चरणी लीन होऊन त्यांच्या स्तुतिसुमनांनी वर्तमानपत्रांचे स्तंभच्या स्तंभ भरून काढणारा आजचा सुशिक्षितांतील बहुसंख्य वर्ग आणि इंग्रजी राज्यापुढे वाकलेला पेशवाईतील ब्राह्मणवर्ग यांत फरक कसा करावा ते समजत नाही. फारतर पोशाख बदलले एवढे म्हणता येईल, पण वाकण्याची, झुकण्याची, गुडघे टेकण्याची, दिपून जाण्याची, तात्कालिक सुखलाभाची वृत्ती तीच आहे. हिटलरच्या आक्रमणापुढे नेपोलियनचा फ्रान्स दोन आठवड्यांत प्रतिकाराचा एक आवाज न उठवता लोळण घेतो याचे लास्कीने दिलेले कारण फ्रेंच सुशिक्षित वर्गाची सुखासीनता

आणि नैतिक अध:पात हे आहे. लोकसत्तेच्या, जनतेच्या शक्तीच्या कितीही गप्पा मारल्या तरी सामाजिक पुरुषार्थाची जबाबदारी विशिष्ट शक्तीने व बुद्धीने युक्त असलेल्या निवडक वर्गालाच पार पाडावी लागते असा इतिहास आहे. ही जबाबदारी सकळिकांसाठी, अखिलांसाठी—त्यातल्या त्यात जे रंजले—गांजलेले असतील त्यांच्या उद्धारासाठी स्वीकारणे एवढीच पुरोगामित्वाची जन्मखूण असते. म्हणून 'बुद्धिस्तु मा गान्मम्' असे चाणक्य म्हणतो. हा आपल्या स्वतंत्र बुद्धीचा प्रत्यय, अभिमान, ताठपणा-ही तर सुशिक्षितांची खास मिरासदारी. वेळ पडल्याम निष्कांचन होऊ-नही ती पेलली पाहिजे, मिरवली पाहिजे. प्रतिष्ठेच्या आणि पैशाच्या मागे धावणाऱ्या आजच्या सुशिक्षित वर्गात असे प्रत्ययाचे पौरुष प्रकट करणारे मिरासदार किती सापडतील ?

नुकतीच उघडकीस आलेली एक घटना नाव घेऊनच सांगण्यासारखी आहे. रशियाचे भाट आणि स्तुतिपाठक ओळखणे सोपे असते; कारण मामला बराच उघड असतो. ठोकळेबाज असतो. पण डॉलरच्या छन-छनाटामुळे नादावलेले अनेक लोक आपल्या अवतीभवती नकळत वावरत असतात, त्यांची त्यांनाही कल्पना नसते—आपण कुठल्या नादात आहोत, आपल्या पायात कुठले फास घोटाळत आहेत. अमेरिकेच्या गुप्तहेर खात्याने (C. I. A.) देशोदेशींच्या सांस्कृतिक, शैक्षणिक संस्थांतून, विद्यार्थी व मजूर संघटनांतून पेरलेल्या पैशांच्या कहाण्या तिकडील वृतपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. सांस्कृतिक स्वातंत्र्यासाठी झगडणारी (म्हणजे काय कोण जाणे!) 'काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम' नामक संस्था जगभर पसरली आहे. भारतातही तिच्या शाखा आहेत. या संस्थेला अमेरिकन पैशाची लागण झालेली आहे, अशी दाट शक्यता व्यक्त करण्यात आलेली आहे. वृत्तपत्रांतून यासंबंधी उलटसुलट चर्चाही सुरू आहे. आपल्याकडे मित्रवर्य डॉ. मा. प. मंगुडकर, प्रसिद्ध मराठी कथालेखक गंगाधर गाडगीळ, विद्वान प्राध्यापक अ. भि. शहा इत्यादी मंडळी या संस्थेचे काम चालवीत असतात आणखीही काही असतील, आता आठवतात ती नावे एवढी. अशा संशयित संस्थेच्या कार्यक्रमांशी निगडीत असणे या बुद्धिवाद्यांना, पुरोगामी सुशिक्षित वर्गाच्या अग्रणींना सुरक्षित कसे वाटू शकते? या

संबंधांमुळे स्वातंत्र्याला—आपल्या स्वतःच्या—मानवी स्वातंत्र्याच्या बाता लांब ठेवू या—मर्यादा पडतात, मतस्वातंत्र्य धोक्याच्या पातळीवर हेलकावे खाऊ लागते, यातूनच वृत्ती मलीन होते, गुलामीची सोनेरी पुटे तिच्यावर हळूहळू चढू लागतात आणि अखेर स्वातंत्र्याचा आणि स्वाभिमानी जीवनाचा यात अंत होतो याची या मानवी स्वातंत्र्यवाद्यांना दखल घ्यावीशी वाटत नाही का? सुप्रसिद्ध 'Encounter' या इंग्लिश मासिकाला अमेरिकेकडून गुप्तमार्गाने पैसा पुरवला जात असे हे उघडकीस आल्यावर या मासिकाच्या एका संपादकाने राजीनामा दिला. स्टीफन स्पेंडर. हा पैसा 'काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम'मार्फतच दिला गेला असाही आरोप आहे. 'कल्चरल फ्रीडम'च्या मागे असे काळेबेरे असल्याचे उघड झाल्यावर किंवा संशय निर्माण झाल्यावरही आमच्याकडेही एखादा स्टीफन स्पेंडर का निघू नये? आमचे मंगुडकर—शहा—गाडगीळ—पाध्ये याबाबत स्वस्थ कसे? या संस्थेतर्फे होणाऱ्या परिसंवादांना आणि परिषदांना—त्यात व्यक्त होणाऱ्या विचारांना आणि जाडजूड प्रवचनांना काही नैतिक संदर्भ अपेक्षित असेल तर या मंडळींनी याबाबतची आपली भूमिका स्पष्ट शब्दांत मांडली पाहिजे. त्याला अनुरूप अशा कृतीची जोड दिली पाहिजे. हे आघाडीवरचे सुशिक्षितच अशा मूलभूत भूमिकेबाबत डळमळीत असतील तर आम्हा इतरेजनांची कथाच काय? उभी दौलत इंग्रजांच्या घशात जात असता नाचगाण्यात आणि पोथ्यापुराणांत दंग राहिलेला व नव्या राज्यकर्त्यांनी आधीच लाचार व गुलाम करून सोडलेला पेशवाईअखेरचा शास्त्रीपंडित-कलाकारवर्ग आणि सारा देश अमेरिकेची वसाहत होण्याच्या अवस्थेला पोचला तरी या ऱ्हासाकडे दुर्लक्ष करून, किंबहुना या ऱ्हासाला कारणीभूत ठरणाऱ्या बौद्धिक व सांस्कृतिक चळवळीत कळत, नकळत सहभागी होऊन, वर पुन्हा 'मानवी स्वातंत्र्या'च्या आणि 'लोकशाही'च्या पोकळ गप्पा मारीत राहणारा आजचा सुशिक्षित बुद्धिजीवी वर्ग यांत फरकच काही उरत नाही.

*रात्र सरली होती. थंडी संपून गारवा जाणवत होता. तुरा असलेला एक कुर्रेबाज मित्र जवळ आला आणि त्याने तुतारी फुंकून जाग आणली. उजाडले होते.*

●




भाववाढ रोखण्याची
सरकार शिकस्त करीत आहे.

# दिल्ली दरबार

— सदाशिव पेठकर

आपले दैनंदिन जीवन आता आणखी किती महाग होणार याचाच प्रत्येकजण सध्या विचार करीत आहे. गेल्या गुरुवारी केंद्रीय अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी आपल्या नव्या कारकीर्दीतील पहिला अर्थसंकल्प जाहीर करून आपल्या वाटचालीची दिशा निश्चित केली. गेल्या मार्चमध्ये अर्थमंत्रिपदाची धुरा स्वीकारली तेव्हापासूनच मोरारजीभाई या अर्थसंकल्पाच्या तयारीत आणि विचारांत गुंतले होते. देशाची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट असताना त्यांनी अर्थमंत्रिपदाची अवघड जबाबदारी स्वीकारली. वस्तुत: त्यांना हे जिकिरीचे आणि कटकटीचे पद नको होते; कारण यापूर्वी ते अर्थमंत्री होते तेव्हा त्यांनी सरकारी उत्पन्नवाढीच्या ज्या ज्या योजना आखल्या त्यामुळे तीव्र लोकक्षोभ होऊन त्यांत त्या योजनांचा बळी पडला. मोरारजीभाईंच्या सुदैवाने एवढी एकच गोष्ट चांगली होती की ही माघार घेत असताना अर्थमंत्रिपद त्यांच्याकडे नव्हते व माघारीची नामुष्की त्यांना टाळता आली. यामुळेच गेल्या फेब्रुवारीतील निवडणुकीनंतर सत्तास्पर्धेच्या राजकारणाचे नवे पर्व सुरू झाले, तेव्हा मोरारजीभाईंसारख्या महत्त्वाकांक्षी माणसाचे लक्ष होते ते प्रधानमंत्रिपदावर. परंतु त्या पदापर्यंत हात पोचत नाहीत, असे आढळून येताच त्यांनी उप-प्रधानमंत्रिपदाबरोबरच गृहखात्याकडे नजर वळविली. परंतु अंतर्गत राजकारणाची सर्व सूत्रे हाती असणारे गृहखाते मोरारजीभाईंसारख्या खंबीर प्रतिस्पर्ध्याकडे सोपविण्याइतक्या इंदिरा गांधी अजाण नव्हत्या. पंडितजींसारख्या मुरब्बी राजनीतिज्ञाच्या सहवासात राहून त्याही या क्षेत्रातील चार गोष्टी शिकल्या आहेत. त्यामुळे त्यांनी मोरारजी देसाई यांना अर्थखाते देऊ केले व हट्टी आणि आग्रही स्वभावाच्या मोरारजीभाईंना ते निरुपायाने स्वीकारावे लागले.

त्यांनी अधिकारसूत्रे घेतली तेव्हा चौथ्या योजनेला प्रारंभ करावयाचा होता. त्यामुळे अर्थमंत्र्याचे मन किती उमेदीचे असावयाला हवे होते. परंतु आपली आर्थिक

# समाजवादाला सोडचिठी

परिस्थिती गेल्या काही वर्षांत इतकी घसरली आहे की आपला देश आज दिवाळ-खोरीच्या कड्यावरच उभा आहे. चीन आणि पाकिस्तान यांच्या आक्रमणांच्या तडाख्यांना उत्तर देताना खर्ची पडलेले परकीय चलन ! अलिप्ततावादाची कसरत करताना कधी रशियाची तर कधी अमेरिकेची गैरमर्जी ओढवून घेतल्यामुळे परकीय मदतीच्या ओघाला पडलेली मर्यादा, महत्त्वाकांक्षी योजनांच्या नावाखाली विकास कार्यक्रमांचा अग्रक्रम ठरविताना झालेल्या चुका, सरकारी खर्चात भरमसाट वाढ होऊनही विकास-कार्यक्रमांचे अपेक्षित फलित हाती येण्यात आलेले अपयश आणि गेल्या दोन वर्षांत पावसाने तोंड दडविल्यामुळे निर्माण झालेली अन्नान्नदशा– या आणि यांसारख्या इतर अनेक कारणांमुळे आज आपण एवढ्या खालच्या पातळीवर येऊन पोचलो आहोत की चौथ्या योजनेचा प्रारंभीचा विचार बाजूला सारून तात्पुरत्या उपाययोजनेवर भर द्यावा लागत आहे.

### मध्यम वर्गावर धाड

चलन फुगवटा रोखणे व किंमती स्थिर राखणे हे आपले मुख्य उद्दिष्ट असल्याचे अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प जाहीर करण्यापूर्वी अनेकवार सांगितले होते. त्यामुळे अर्थ-कारणाला क्रांतिकारक गतिमानता देण्याच्या दृष्टीने ते आपल्या अर्थसंकल्पाची मांडामांड करतील अशी अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्ष अर्थसंकल्प पाहिल्यानंतर काहीही क्रांतिकारक करण्याची कॉंग्रेस पक्षाची ताकदच नष्ट झाली आहे हे दिसून आले आहे. औद्योगिक उत्पादनाला चालना देण्यासाठी उद्योगपतींना नाखूष करून चालणार नव्हते व त्यामुळे अर्थमंत्र्यांनी या वर्गाला त्रास होणार नाही एवढी दक्षता घेतली. चलनवाढ थांबविण्यासाठी तुटीचा अर्थसंकल्प करणेही त्यांना परवडण्यासारखे नव्हते. त्यामुळे शेवटी त्यांना आपला रोख वळवावा लागला तो शारीरिक किंवा बौद्धिक श्रम करून आपली गुजराण करणाऱ्या कनिष्ठ आणि मध्यम वर्गाकडेच.

त्यातून आपले अर्थमंत्री-पडले निर्व्यसनी. त्यामुळे दिवसभरच्या श्रमामुळे थकलेल्या कामगाराने विरंगुळ्यासाठी स्वतःला लावून घेतलेली व्यसनेही आपल्या या 'शुचिर्भूत' अर्थमंत्र्यांना पसंत पडत नाहीत. या अर्थसंकल्पामध्ये त्यांनी सिगारेटवरील जकातीत वाढ करून धूम्रपान करणाऱ्यांची गैरसोय केलेली आहे. मला वाटते मोरारजीभाई यांच्या या अर्थसंकल्पात सिगारेटवर वक्रदृष्टी वळणार याची संबंधितांना इतकी खात्री पटली होती की अर्थसंकल्प जाहीर होण्यापूर्वी दहा दिवस अगोदरच दुकानांमध्ये हारीने मांडून ठेवलेली सिगारेटची पाकिटे काळ्या बाजारात गेली व चढ्या भावाने विकली जाऊ लागली.

जी गोष्ट सिगारेटची तीच चहा–कॉफी ह्या जनसामान्यांच्या पेयांची ! आधीच साखरेच्या दुर्भिक्ष्यामुळे व दुधाच्या भाववाढीमुळे आल्या-गेल्याच्या स्वागतासाठी ही पेये तयार करणे जनसामान्यांना अवघड होऊन बसले आहे. त्यातच मोरारजीभाईंनी चहा-कॉफीवरील जकातीत वाढ केल्यामुळे त्यांची भाववाढ होणार आहे. बरे, या बाबतींतही आपला व्यापारी वर्ग मोठा तयार आहे. सरकारी करवाढीत आपल्या जादा नफ्याची भर टाकण्यास ते मुळीच विसरत नाहीत.

पेट्रोल आणि डिझेल यांच्यावरील उत्पादनकरांत वाढ केल्यामुळे व्यापाऱ्यांच्या वाहतूक-खर्चात वाढ होणार व त्याचा परिणाम प्रत्येक वस्तूचे भाव वाढण्यात होणार हे उघड आहे. अर्थमंत्र्यांच्या अगोदर चार दिवस रेल्वेमंत्र्यांनी आपल्या खात्याचा अर्थसंकल्प जाहीर करून त्यात प्रवास व माल वाहतुकीच्या दरांत वाढ करण्याची घोषणा केलेलीच आहे. अशा रीतीने महागाईने आधी त्रस्त झालेल्या नागरिकांना मोरारजीभाईंच्या नव्या अर्थसंकल्पाने किंचित्‌देखील दिलासा देण्याऐवजी त्यांच्या व्यग्रतेत भर मात्र घातली आहे. श्री. मोरारजीभाई लोकसभेत अर्थसंकल्प वाचून दाखवीत असताना विरोधी पक्षांचे सदस्य या नव्या तरतुदी ऐकून उपहासाचे उद्‌गार काढत होते ते यामुळेच. परंतु मोरारजीभाई इतके हट्टी आहेत की, आपले आग्रह इतरांवर लादण्यात त्यांना एक प्रकारचा आनंद होतो. साऱ्या देशाला एवढ्या प्रचंड आर्थिक संकटाने आव्हान दिलेले असताना 'बिडी-माचिस-चहा' महाग करून महसुली उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ बसविण्याचा अर्थमंत्र्यांचा हा केविलवाणा प्रयत्न म्हणजे केरसुणीने समुद्राला मागे हटविण्याचा प्रयत्न करण्याइतके हास्यास्पद आहे. परंतु त्यामुळे बिर्लांच्या औद्योगिक साम्राज्याच्या विस्ताराला हातभार लावण्यात मश्गुल असलेला काँग्रेस पक्ष सर्वसामान्य जनतेचे मनोगत ध्यानात घेण्यास तयार नाही एवढे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. एकंदरीत आवडीच्या समाजवादाची वाटचाल ही अशी आहे तर !

## राजकोट–भावनगर

मोरारजीभाईंच्या अर्थसंकल्पामुळे अशा तऱ्हेची प्रतिक्रिया व्यक्त होत असतानाच मोरारजीभाईंचा गुजरात एका निराळ्याच कारणामुळे पेटून उठत आहे.

नव्याने स्थापन होणारे सौराष्ट्र विद्यापीठ राजकोट येथे असावे की भावनगर येथे असावे, हा वाद वस्तुतः मामुली स्वरूपाचा. शैक्षणिक व अन्य सोयी ध्यानात घेऊन शिक्षणतज्ज्ञांनी याबाबतचा निर्णय कळविला. परंतु कोणत्याही विषयाचा प्रश्न करण्याची आमच्या राजकीय कार्यकर्त्यांची हौस येथेही कडमडली आणि त्यामुळे या मामुली प्रश्नावरून भावनगर जिल्हा कॉंग्रेस समिती बंद पडण्याची वेळ आली. बरे, कॉंग्रेसवाल्यांनी हा खेळ खेळला तरी विरोधी पक्षांनी गप्प बसावे. पण तेही नाही. राजकोटचा उजवा कम्युनिस्ट भावनगरच्या उजव्या कम्युनिस्टाविरुद्ध उभा टाकला. जी गोष्ट कम्युनिस्ट पक्षाची तीच त्याच्याबरोबर फरफटत चाललेल्या समाजवाद्यांची. भावनगर व राजकोट येथे चाललेले वादंग पाहिले व त्यात राजकीय कार्यकर्त्यांनी घातलेला धुमाकूळ अवलोकिला की राजकोट की भावनगर या प्रश्नापुढे इतर सारे लहानमोठे प्रश्न क्षुद्र मानण्याची आपल्या सरकारपक्षीय आणि विरोधीपक्षीय कार्यकर्त्यांची ही राजकीय मुत्सद्देगिरी कशी दीडदमडीची आहे, हे ध्यानात यावयास वेळ लागत नाही.

कोणत्याही स्थानिक प्रश्नांत आपल्या येथले सारे राजकीय पक्ष इतका रस घेतात की त्यापुढे त्यांना राष्ट्रीय स्वरूपाच्या समस्यांची जाणीवच होत नाही. उद्या समजा, काही कारणावरून पार्लमेंट स्ट्रीटवरचे आकाशवाणी केन्द्र दिल्ली-जवळच्या फरिदाबादला हलविण्याचे ठरविले तरी पार्लमेंट स्ट्रीटवरील कॉंग्रेस-वाले व कम्युनिस्ट एका बाजूला व फरीदाबादचे कॉंग्रेसवाले व कम्युनिस्ट दुसऱ्या बाजूस असे दृश्य पाहावयास मिळाले तरी आश्चर्य वाटावयास नको.

अखेर सौराष्ट्र विद्यापीठ राजकोटला ठेवण्याचे ठरल्यामुळे राजकोट शांत झाले असून भावनगर मात्र धुमसत आहे. या धुमसण्याची परिणतीही आता ठराविक स्वरूपाची झाली आहे. रस्त्यावरचे खांब व मोटारी यांना आगी लावणे, इमारतीं-वर दगडफेक करणे, येणाऱ्या-जाणाऱ्यांची अप्रतिष्ठा करणे ही आमच्या सत्याग्रहाची व निदर्शनाची हिंसक आणि घातकी स्वरूपे पाहिली की संसदीय लोकशाहीचा केवळ सांगाडाच आपण उचलला आहे काय असा प्रश्न पडतो. मला गंमत वाटते ती आपल्या डाव्या पक्षांची. एका बाजूस हे सारे व्हिएटनामपासून क्यूबापर्यंत बोलत असतात. परंतु राजकोट की भावनगर असा क्षुल्लक प्रश्न निघाला की त्यांचे हे आंतरराष्ट्रीय मुखवटे पार कोसळून पडतात व पन्नास–शंभर मैलांवरच्या गावा-विरुद्ध आणि गावकऱ्यांविरुद्ध क्रांतीच्या थाटात उभे राहतात. नाही तरी दैनंदिन जीवनातील त्रासामुळे कावलेल्या आणि चिडलेल्या नागरिकांना प्राप्त परिस्थितीचा विसर पाडण्यासाठी या निदर्शनांच्या अफूच्या गोळीचा चांगला उपयोग होतो एवढे मात्र नक्की.

●

# मुक्ताफळे



## ☐ रिपब्लिकन वाणी

आपल्या देशात काहीही वाढत नाही, परंतु लोकसंख्या व मंत्रिमंडळे सतत वाढतात, हे आपले भाग्य होय. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात वाढ होणार आहे ही बातमी म्हणूनच स्वागतार्ह आहे. एखाद्या सरकारी किंवा खाजगी कार्यालयाचे काम वाढले किंवा जादा काम निर्माण झाले तर लगेच माणसे वाढवण्यात येतात. तत्पूर्वी खरोखरच काम वाढले आहे, आहे त्या माणसांना काम वाटून खर्च वाचवता येणार नाही का अशा नाना चौकशा व चिकित्सा करण्यात येतात; कारण आपल्या देशाची एकंदर परिस्थिती हलाखीची आहे. काटकसर केली नाही तर इंदिरा गांधी, मोरारजी हे रागावतील. परंतु मंत्रिमंडळात जेव्हा मंत्री वाढवण्याचे ठरते तेव्हा अशा फालतू चौकशा कुणी करत नाही. कारण मंत्र्यांच्या संख्येचा कामाशी काही संबंध नसतो ! ही साधी गोष्ट आपण पुन: पुन: पुन: कशी विसरतो ! पहिल्यांदा मुख्यमंत्री निवडण्यात आला, की राज्यपाल त्यांना सांगतात– बनवा मंत्रिमंडळ. मग दोन–तीन दिवस ' मुख्य मंत्र्यांना किती मंत्री होतील ' याचे तर्कवितर्क सुरू होतात. माणसांना क्वचित जुळे होते, वाघाला प्रसंगी पाच बच्चे होतात, शेळीला तीन पिल्ले होतात हे खरे आहे. तरी साधारणपणे जास्तीत जास्त किती पिल्ले होतील हे बाह्य लक्षणांवरून किंवा अंदाजाने सांगता येते. परंतु मुख्यमंत्र्यांची लक्षणे ही मंत्र्यांची संख्या ठरवीत नसून, प्रांतातली अवलक्षणे ही संख्या ठरवीत असतात. यामुळे हा आकडा कुणाला सांगता येत नाही. आतापर्यंत साधारणपणे अशी मध्येच मंत्रिसंख्या वाढत नसे. परंतु ना. नाईक यांना आता पुन: रिपब्लिकन जुळे होणार असल्याची बातमी आहे. या मंत्र्यांना अर्थात काहीही नवे काम निर्माण झालेले नाही. परंतु महाराष्ट्राची आर्थिक स्थिती आता इतकी सुधारली आहे की वर्षाला ४०–५० हजार रुपये जादा खर्च झाले तरी फारसे बिघडत नाही आणि आली तर सरकारी नोकरांत योग्य ती कपात करून तूट भरून काढता येईल किंवा आपण कर वाढवू शकतो.

नवे मंत्री घेण्याचे ठरले त्यापूर्वी ना. नाईक यांनी मंत्रिमंडळाची सभा घेतली व सुचवले की, दोन गायकवाडी मंडळी मंत्रिमंडळात घ्यायची आहेत. बाहेर 'घेरा डालो' सुरू आहे तेव्हा त्या कुणीतरी दोन मंत्र्यांनी राजीनामे दिल्यास सोईचे होईल. ना. नाईकांच्या तोंडून हे शब्द निघताच मंत्रिमंडळाचे सर्व सभासद एकदम नाईकांना म्हणाले, "देशासाठी हा त्याग करण्याची संधी आम्हांला द्या!" जो तो राजीनामा लिहू लागला. देशावर प्रेम करणारांचे असे असते. नाईकांची मोठी पंचाईत झाली. कोणा दोघांना काढावे? ना. नाईकांची नजर एकेका मंत्रिमंडळाच्या सभासदावरून पुढे पुढे सरकू लागली की विरहाच्या कल्पनेने त्यांना व मंत्र्यांना हुंदका अनावर होई. काही वेळ फक्त हुंदके ऐकू येत होते. शेवटी ना. चव्हाणांचा सल्ला घेण्यात आला. ना. चव्हाण म्हणाले, "पाकिस्तानी युद्धाच्या वेळी बलवंतराय मेहता यांच्या मरणाचा सूड घेण्याची घोषणा मी केलेली आहे. त्या घनघोर लढाईच्या वेळी त्याग करण्याची संधी सर्वांना मिळणारच आहे. आज घाई नको. आपण तूर्त दोन मंत्री वाढवा व अधिक त्यागाची सिद्धता करा. एकदम सर्व रंग पालटला. सर्वजणांनी साहेबांची तारीफ केली. मंत्रिमंडळ वाढवण्याचे ठरले.

मंत्रिमंडळ वाढणार एवढीच बातमी पसरताच, बॅ. गुंडो पाटील यांना मागील खेपेस जागा नसल्याने मंत्रिमंडळात घेता आलेले नव्हते त्यामुळे त्यांचे नाव पुढे येईल, असे वाटले होते. परंतु नाईक यांनी खुलासा केला–

"जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत गायकवाड गटाने आपल्या काँग्रेसला मते देण्याचे ठरवले आहे. हा समझोता पुढेही टिकावा. याकरिता दोन्ही मंत्री रिपब्लिकन पक्षाचे घेण्यात येतील. अर्थात निवडणुका संपल्या व रिपब्लिकन पक्षाने नक्की मते दिली असे निकालांवरून सिद्ध झाले की मगच हे नवे हत्ती मंत्रिमंडळात यतील!" याला म्हणतात, धूर्त समझोता! ताश्कंद करारासारखा इथे बावळटपणा नाही. आधी मते मग नाते!

असं म्हणतात, की आर. एस. गवई व शांताबाई दाणी यांना मंत्रिमंडळात घेण्यात येणार आहे.

सार्वजनिक निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाला 'गवयांचा' तुटवडा निर्माण झाला आहे. कौतुक काय ते इतर पक्षांचे. या दृष्टीने गवई यांची निवड योग्य आहे. शेतीचा कार्यक्रम हाती घेऊन महाराष्ट्रात चार दाणे अधिक पिकवण्याचा ना. नाईक यांचा मनोदय प्रतिवर्षी जाहीर होत असतो. दाण्याचे जमेल तेव्हा जमेल! तूर्त दाणी वाढणार आहेत. अत्तरदाणीत अत्तर असतं, गुलाबदाणीत गुलाबपाणी असते, तसेच रिपब्लिकन दाणीत मते असतात.

## ☐ हनीफ–शकुंतला

नाशिकजवळ दोंडाईचे येथे हनीफखान पठाण नावाच्या ट्रक ड्रायव्हरने शकुंतला नावाच्या सोळा वर्षांच्या मुलीस पळवून तिचेवर बलात्कार केला व तिचे लग्न

आपला मित्र शेख अमीर याचे-बरोबर लावण्यासाठी तिला धुळ्याला नेली, अशी बातमी कळताच, गावात खळबळ माजल्याचे भयानक वृत्त नाशिकहून आले आहे. खळबळ माजण्याचे कारण आम्हांला समजत नाही. आरोपी मुसलमान आहे व मुलगी हिंदू आहे यात नवल ते काय ? नेहमी घडणारी ही गोष्ट आहे. तेव्हा खळबळ माजवणाऱ्या लोकांना सरकारने ताबडतोब पकडावे, अशी आमची सूचना आहे. दुष्यंताने जे त्या शकुंतलेच्या बाबतीत केले तेच हनीफखानने या शकुंतलेच्या बाबतीत केले. फरक इतकाच की या वेळी शकुंतलेची संमती नव्हती. हा फरक क्षुल्लक आहे. उलट या हनीफने तिचा निका लावण्याचीही सोय केली, हे काय कमी झाले ? खळबळ वगैरे माजवण्याचे काही एक कारण नाही. —ग्यानबा

## धडा पहिला

फलटणचे माजी राजे मालोजीराव निंबाळकर यांनी दिल्लीचे सध्याचे राजे यशवंतराव चव्हाण यांचेसंबंधी लातूर येथे सांगितले की, "यशवंतराव चव्हाण दिलेला शब्द पाळतीलच असे नाही." मालोजीरावांनी फक्त यशवंतरावांवरच असा आरोप का करावा हे आम्हांला समजत नाही. मागे मनमोहन राजवाड्यातून यशवंतरावांबरोबर मालोजीरावांनीही घोषणा केली की संयुक्त महाराष्ट्रापेक्षा नेहरू श्रेष्ठ आहेत. पण शेवटी संयुक्त महाराष्ट्राचा कलश आणणे मालोजीरावांना का जमले नाही, राजकारणात त्यांचे असे का झाले याचा त्यांनी विचार करावा. त्यांच्यासाठी लोकशाही राजकारणाचा एक अगदी प्राथमिक धडा खाली देत आहोत.

"लोकशाहीतील यशस्वी राजकारणी पुढारी हे असुरक्षित असतात, दहशत खाल्लेले असतात. ते राजकारणात पुढे सरकतात ते लोकांना वश करून, लाच देऊन, फूस लावून, लबाडी करून किंवा अन्य काही प्रकाराने आपल्या मतदार संघातील मागण्या करणाऱ्या धमक्या देणाऱ्या मंडळींशी तडजोड करूनच."

"Successful democratic politicians are insecure, intimidated men. They advance politically only as they placate, bribe, seduce, bamboozle, or otherwise manage to manipulate the demanding, threatening elements in their constituency" (an American view).

लोकशाहीत शब्द पाळण्यापेक्षा गाळलेले शब्द भरणे जमावे लागते. निदान गाळलेले मंत्री भरणे जमावे लागते !

भारतीय लोकशाही ज्यांच्या नावाने चालते ती माणसे दीडशे वर्षांच्या गुलामीनंतर आजच्या अमेरिकन जनतेएवढीच 'चांडाळ' राहिली हे आपले खरोखर नशिब होय !

## ओंजळीत एक रात्र

ओंजळीत एक रात्र चंद्राने भरलेली
वलयडौल लचकतनू सळसळुनी लवलेली
आतुरसे आर्तभाव नेत्रांच्या लावणीत
स्वप्नचिंब डुचमळती श्यामलघट व्योमतळी
गहन निळे दीपपंख पालवीत भारावुन
मग्न उभी गंधाच्या काठावर हिंदकळून
अंकुरत्या स्वरवेली वेढुनिया देहधुंद
श्वासांच्या गगनांतून मिटलेली शब्दधून
ओंजळीत घेउनिया अर्घ्य असे रात्रीचे
दान इथे देताना देणारी विरघळते !

— *विद्याधर भागवत*

## एक दिवस

मरगळलेल्या मनाने
एक दिवस उजाडतो
उत्साही दिवस
क्षणभर रेंगाळतो
कंटाळलेले आभाळ
मुक्याने जांभई
क्षणिक निराशा
अनंताची
चित्रविचित्र भास
क्षणाक्षणाला पाठलाग
मरगळलेला दिवस
निसटती चौकट
अकाळविकाळ भास
ढगाएवढा जबडा
कंटाळलेल्या दिवसाची
पतंगासारखी झेप... !

—*विठ्ठल चलवादी.*

## आस्वाद

विद्याधर भागवत 'ओंजळीत एक रात्र' घेताना तीत अनेक कल्पना भरतात. 'वलयडौल लचकतनू' यात शाहिरी काव्याचा भास आहे. मुग्धता इथेही आहेच. 'स्वप्न चिंब' हा समास कल्पकतेला गती देणारा आहे ? स्वप्नाने चिंब की स्वप्नात चिंब ? पण अशा काहीशा कठीण कल्पना ओलांडून शेवटल्या दोन ओळींवर वाचक विसावतो तो मात्र संतुष्ट होऊन. दान देणारी व्यक्ती संपूर्णपणे शून्य होईल म्हणजे अहंतेच्या पलीकडे जाईल, तेव्हाच त्या दानाची खरी पूर्तता होणार.

'एक दिवस मरगळलेल्या मनाने उजाडतो,' असे विठ्ठल चलवादी म्हणतात. या कवितेच्या रचनेत पहिल्या कवितेत दोन क्रियापदे हजेरी लावून जातात. मग येतात नुसती विशेषणे आणि नामे ! एखादा चित्रकार स्थूल रंगाच्या फटकाऱ्याने एखादे दृश्य चितारतो तसे हे आहे. दुसऱ्या कडव्यात 'जांभई देते' असे स्पष्ट म्हणावयास पाहिजे होते. पण एकत्रित परिणाम चांगला होतो. पतंगासारखी झेप येताच कविता संपली हे बरोबर झाले.

— *गोपीनाथ तळवलकर*



# दक्षिणायन

*नुकतेच ४१ तामीळ लेखक मुंबईला येऊन गेले.*

*त्यांचा यथोचित सत्कारही करण्यात आला.*

*परंतु त्याआधी पुण्यातील तीन साहित्यिक तामीळनाडूला जाऊन, तेथे आठवडाभर राहूनही परतले होते.*

*त्यांचा जाण्याचा उद्देश?*

*त्यांनी पाहिलेले जग?*

*त्यासाठीच हे दक्षिणायन–*

**श्री. ज. जोशी**

## १

पृथ्वी सारखी फिरत असते. माणूस मात्र स्थिर असतो. वेडया माणसाच्या हे कधी लक्षातच येत नाही. अनादी कालापासून ही वसुंधरा स्थिर आहे. बदलरहित आहे असंच त्याला वाटत असतं. पृथ्वीत मोठमोठे उत्पात सारखे होतच असतात. हिमालयांचे महासागर होतात. सुपीक जमिनींची वाळवंटे होतात. सपाट मैदानांची बेटे बनतात! ......माणसाला मात्र हे कळत नाही. आसपासचे हे बदल त्याच्या लक्षातच येत नाहीत. तो सगळेच शाश्वत आहे असे धरून चालतो.

राजकीय आणि सामाजिक परिवर्तनांचेही तसेच असते. त्या क्षेत्रातही

सारखे उत्पात घडत असतात; पण माणसाच्या तें लक्षात येत नाहीत. त्या त्या क्षेत्रातल्या जीवनाची चौकट तशीच राहणार आहे, असं त्याला सारखं वाटत असतं.

लहानशी नोकरी करणारा मी एक सामान्य माणूस आहे. साहित्यात मी रस घेतो. वृत्तपत्रांचे माझे वाचन अद्ययावत आहे. राजकीय पक्षांविषयी आणि त्यांच्या सामर्थ्याविषयी माझ्या कल्पना ठाम बनलेल्या आहेत. प्रत्येक पक्षावर, प्रत्येक जातीवर, प्रत्येक प्रांतावर मी माझ्या लहानपणापासून लेबले चिकटवलेली आहेत. ते ते पक्ष, त्या त्या जाती, तशाच राहणार असा माझा विश्वास आहे.

राजकारणाकडे पाहण्याची माझी दृष्टी तिऱ्हाईताची आहे, स्थूलही आहे. सत्तेचाळीस साली स्वातंत्र्य मिळाले आणि या देशात मोठमोठे उत्पात झाले. त्या वेळीही मी अविचल होतो. दर पाच वर्षांनी निवडणुका व्हायच्या. भक्तिभावाने केंद्रावर जाऊन काँग्रेसला मत द्यायचे एवढेच माझे काम होते! महागाईबद्दल, भाषावर प्रांतरचनेबद्दल, लाचलुचपत, वशिलेबाजीबद्दल वर्तमानपत्रे वाचून मी चिडचीड करी. पुढाऱ्यांची भाषणे ऐकून मला कधी कधी आवेशही येई. पण ते सारे तितक्याच पुरते असे. भारतातील राजकीय क्षेत्रात कधी काही बदल व्हायचा नाही अशी माझी खात्री असे. वशिल्याची घाण कधी निघायची नाही, जातीयवादाची दुर्गंधी कधी संपायची नाही, अन्नवस्त्राचे साधे प्रश्न सुटण्याचा संभव नाही. परक्या राष्ट्रांपुढे भीक मागितल्याशिवाय जगता यायचे नाही, अशी माझी ठाम समजूत होती. काँग्रेसचे या देशातले राज्य कधी संपायचे नाही हे मला माहीत होते. वर्तमानपत्रे वाचून मी कित्येक विषय चिवडीत असे. त्याचा हेतू फक्त मनोविनोदन करण्याइतपच होता. एका दृष्टीने मी एक आदर्श कोडगा पुरुष होतो.

हे असेच चालले होते. या वर्षीच्या निवडणुकांच्या तुताऱ्या फुंकल्या गेल्या, उमेदवारांच्या याद्या जाहीर झाल्या. पक्षोपपक्षांचे जाहीरनामे प्रसिद्ध झाले. वर्तमानपत्रांतून शब्दांच्या लढाया झडू लागल्या. पण मी शांतच होतो. शेवटी काँग्रेसचा जय व्हायचा, हे मी धरून चाललो होतो. स्वतःच्या छोट्या, ओशट आयुष्यात त्यामुळेच मी रमलो होतो. लहान मुलांच्या खेळाकड मोठ्या माणसानं बघावं, त्याप्रमाणे मी निवडणुकींकडे बघत होतो.

निवडणुका संपल्या, आणि ठिकठिकाणचे निकाल जाहीर व्हायला लागले. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, या बाजूला 'जैसे थे' होते. परंतु इतर प्रांतांतील निवडणुकींचे निकाल भयावह होते. मुंबईच्या स. का. पाटलांच्या निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी पहिला जोराचा हादरा बसला होता. अकल्पितच घडले होते... मुंगीने मेरू पर्वत गिळला होता. पाटलांसारखा एवढा मोठा दिग्गज, जॉर्ज फर्नांडिससारख्या 'मामुली' माणसानं भुईसपाट केला होता......तो निकाल मी ऐकला आणि बैचेन झालो. खरा खरा अस्वस्थ झालो. माझ्या मनातल्या जुन्या जगाला फार मोठा तडा गेल्याची भावना निर्माण झाली......ऑफिसात काम करायचे...

इंग्रजी कथा कादंबऱ्या वाचायच्या...नवकथेविषयीच्या त्याच त्याच ओशट, बुळबुळीत चर्चा लेखक-मित्राबरोबर करायच्या...जास्त मडक बोलायची इच्छा झाल्यास अश्लील वाङ्मयाविषयी चर्चा करायची, स्वत:वरच खुष असायचे, हा माझा तोपर्यंतचा जीवनक्रम होता. परंतु आता काही नवे घडले होते. माझा जुना जीवन-कोश फाटून गेला होता.

ते पाच–सात दिवस मी बेचैन–बेमान अवस्थेत काढले. वातावरणात भूकंप होत होते. त्यात ललितलेखक म्हणून माझी स्वतःची काही जबाबदारी आहे असे वाटत होते. नुसत्याच नवकथेबद्दलच्या चर्चा करून आता भागायचं नाही ही जाणीव होत होती. काहीतरी करायला पाहिजे, नवे जीवन घडत आहे, त्याचे पडसाद लेखकानं उमटवायला हवेत, अशी भावना होत होती. कथा-कादंबऱ्यांत कोणच्या तरी नायक-नायिकेचे मन:स्पंदन विचरत बसण्यापेक्षा, जॉर्ज फर्नांडिसचा विजय चित्रीत करायला हवा, असं वाटत होतं. एखाद्या करुणरम्य कादंबरीप्रमाणे फर्नांडिसच्या विजयाची कहाणी वाचकांना सांगायला हवी, स. का. पाटील यांचे व्यक्तिचित्र रेखाटायला हवे, जॉर्जनं संघटना कशी बांधली हे सांगायला हवं. मुंबईच्या लाखो मतदारांच्या मनांत निवडणुकीच्या त्या दिवसांत ज्या प्रक्रिया उमटल्या, त्यांचं चित्रण करायला हवं, अशी भूक लागली. महाभारतात शेकडो पात्रे घेऊन त्यांची विविध स्वभावचित्रे व्यासांनी रेखाटली. एका फार मोठ्या फलकावर हजारो माणसांचे मानवी जीवन महाभारतकारांनी विणले. त्याप्रमाणे मुंबईच्या मतदारांचे जीवन आपल्या अल्पशक्तीनुसार चित्रीत करावे अशी इच्छा झाली.

कर्मधर्मसंयोगाने त्याच अवस्थेत असताना 'माणूस 'चे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर यांची गाठ पडली. तिथेच कथालेखक श्री. विद्याधर पुंडलिक आणि वि. ग. कानिटकर हेही भेटले. मुंबईला प्रत्यक्ष जाऊन तेथल्या जीवनाविषयी काही लिहावे, अशी कल्पना मी पुढे मांडताच माजगावकरांनी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे डोळे किलकिले केले आणि माझ्याकडे बघत ते हसले.

मी आणि पुंडलिक बोलतच होतो, पण माजगावकर बराच वेळ गप्पच होते. नंतर ते म्हणाले, "मुंबईला जायची कल्पना चांगली आहे. पण त्यानंच नुसतं भागणार नाही. त्यापेक्षा दुसऱ्या एखाद्या लांबच्या प्रांतात जावं...तिथलं जीवन बघावं..." इतके बोलून त्यांनी काही विचार केला व मग ते म्हणाले, "या चार-पाच दिवसांत उत्तर प्रदेशातले आणि तामीळनाडमधले निकाल जाहीर झाले आहेत. मद्रासेत डी. एम. के. सारखा पक्ष अधिकारारूढ होण्याच्या मार्गावर आहे...दक्षिण भारतातील सत्तास्पर्धेच्या दृष्टीनं हा संधिकाल आहे. तिथं तुमच्यासारख्यांनी का जाऊ नये ? "

"आम्ही जाऊन काय उपयोग ? राजकारणाचा आमचा अभ्यास नाही. वर्तमानपत्रांचे आम्ही बातमीदार नाही..."

" म्हणूनच मला वाटतं तुम्ही जावं. अशा संधिकालात धंदेवाईक राजकारण्यांनी जाण्यापेक्षा ललित लेखकांनी जावं हे बरं. लेखकांना लोकांच्या भावना जास्त चांगल्या कळतील. त्यांच्या विचारांतील गुंतागुंत ते जास्तच जिवंतपणे चित्रीत करतील...मला वाटतं तुम्ही जाच...तामीळनाडमध्ये जाऊन तिथल्या जनतेच्या भावना तुम्ही जाणून घ्या..."

आम्ही नाना प्रकारांनी आढेवेढे घेतले...... ' मद्राससारख्या प्रांतात आठ दिवस राहून तिथलं जीवन काय कळणार ? ... लेखक म्हणून आम्ही त्याचं चित्रण तरी कसं करणार ?' ही मुख्य शंका होती. ब्रह्मदेशात एक दिवस राहून आल्यावर मराठीतील एका ख्यातनाम कादंबरीकाराने तिथल्या जीवनाच्या पार्श्वभूमीवर एक दिलखेचक कादंबरी पूर्वी लिहिली होती. तसलाच प्रकार हा ठरेल अशी भीती वाटली. तिथे कोणी ओळखीचे नाही ...... तामिळ भाषेचं ' ओ ' का ' गे ' कळत नाही ... आम्हांला स्वतःला ' प्रेस्टिज ' नाही. त्यामुळे नामवंत पुढाऱ्यांच्या दिवाणखान्यात शिरकाव होणे अशक्य आहे इत्यादी अनेक भुते मनात उभी राहिली; परंतु माजगावकरांनी पाठपुरावा सोडला नाही. मद्रासला जायचें नक्की करूनच त्या दिवशी तेथून बाहेर पडलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो आणि मनाला चमत्कारिक वाटायला लागले. रात्रभर निरनिराळ्या विचारांनी फेर धरला होता...मद्रास ! ...भूगोलात त्याचं स्थान माहिती होतं, पण माझ्या भावनिक जीवनात त्या प्रांताला मुळीच स्थान नव्हतं...दिल्ली, आग्रा, अलाहाबाद, बनारस या गावांशी माझ्या मनाचा सांधा जुळलेला होता. ही गावे न बघताच तेथली तसून् तंसू मला माहिती होती. शहाजहान, अकबर आणि औरंगजेब ! ...घरातल्या आप्ताप्रमाणे ते होते. माझ्या पूर्वीच्या कित्येक पिढ्यांना ते परिचित होते...राणासंग...रूपनगरची राजकन्या...महाराजा मानसिंग...सारी माणसं माझ्या मनश्चक्षूपुढे प्रत्यक्ष वावरलेली होती. अरवली पर्वताच्या जंगलातून मी कित्येक वेळा फेरफटका केला होता. नूरजहानला बघितले होते. जहांगीरच्या विलासी दरबारात मी जाऊन आलो होतो...उत्तर भारतातलं मला काहीच नवीन नव्हतं मी तिथलाच होतो. परंतु मद्रासबद्दल माझ्या इतिहासात जवळ जवळ एक ओळही नव्हती. हैदर, टिपू, रॉबर्ट क्लाईव्ह...! ही माणसं माहीत होती. परंतु अकबर, औरंगजेबाप्रमाणे ती माझ्या निकटची कधीच नव्हती. श्रीरंग-पट्टणच्या लढाईमुळे माझं रक्त कधीच तापलं नव्हतं. शिरा थरथरल्या नव्हत्या. त्या लढाया आणि ती माणसं माझ्या दृष्टीनं अगदीच अळणी आणि बेचव होती.

मग एकदम विचार आला की, भारताचा हा भूभाग मला सर्वस्वी अपरिचित आहे. त्याची दारं बंद आहेत. किलकिल्या डोळ्यांनीदेखील मी त्या प्रदेशाच्या आत बघितलेलं नाही. रामेश्वर, कन्याकुमारी, मीनाक्षी.. ही धर्ममंदिरे मला पूज्य आहेत. माझ्या पूर्वजांपैकी कुणीतरी त्यांच्या यात्रा कदाचित केल्याही असतील. पण

मला मात्र प्रयागच्या त्रिवेणी संगमाचे आणि काशीच्या विश्वेश्वराचे आकर्षणच जास्त आहे. गंगा आणि यमुना यांना मी मानतो. कावेरी आणि तुंगभद्रेचे महत्त्व त्या मानाने मला नाही. 'अयोध्या, मथुरा, गाया, काशी, कांची, अवंतिका' या मोक्षदायिनी नगरीच्या नामावलीत मद्रास प्रांतातले एकही क्षेत्र नाही. माझ्या मराठी मनाला मद्रास प्रांताबद्दल तशी जवळीक पूर्वीपासूनच कधी वाटलेली नाही.

नकाशातल्या मद्रासकडे मी बघत होतो आणि एखाद्या परदेशाकडे बघावे तसा मला भास होत होता. मनाची पाटी जवळ जवळ कोरीच होती. तिथली भाषा, संस्कृती, लोकरीती सगळंच अज्ञात होतं.

मला गम्मत वाटली. भारताच्या एका प्रांताबद्दल माझं हे अज्ञान चमत्कारिक होतं. मी माझं मन तपासायाला लागलो आणि मद्रासी लोकांविषयीच्या माझ्या प्रक्रिया अजमावल्या...मद्रासी माणूस !...प्रथम मी केव्हा पाहिला, ते आठवत नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत त्याला मी क्वचितच पाहिला असेल !... रास्ता पेठेत त्यांची त्या वेळीही वस्ती होती. पण ती तुरळकच ! वीस–पंचवीस वर्षांपूर्वी 'इडली' आणि 'डोसा' यांची पुण्यात नावनिशाणीही नव्हती. डोशाला समांतर निदान घावन तरी होता. पण इडलीला तर जोडच नव्हती.

दुसऱ्या महायुद्धापासून पुण्याचं सामाजिक जीवन बदलले आणि मद्रदेशीय अय्या व अण्णा यांची आयात इथे जोराने सुरू झाली. खडकी, वानवडी, देहूरोड इथल्या लष्करी कार्यालयात अय्यांशिवाय दुसरी माणसे दिसणे मुष्किल झाले. इतर अनेक सामान्य मराठी माणसांप्रमाणे त्या दिवसांत मीही मिलिटरीत नोकरी धरली आणि मग माझ्या डोळ्यांपुढे एक नवीनच काळे विश्व उमलले, 'संबंधम्', 'त्यागराजन्', 'कृष्णमूर्ति', 'सुब्रह्मण्यम्', 'बालसुंदरम्' वगैरे नावे धारण करणाऱ्या माणसांच्या सहवासात मी जास्त जास्त आलो. प्रथम मी त्यांना कमी लेखत असे. माझा मराठी बाणा त्या निव्वळ कारकुनीत रस घेणाऱ्या मद्रदेशीय माणसांचा मोठेपणा मान्य करण्याइतका लेचापेचा नव्हता. मी शिवाजीचा आणि पेशव्यांचा वंशज आहे. माझ्या पूर्वजांनी अटकेपार झेंडे रोवलेले आहेत. अल्पकाळ का होईना, पण दिल्लीचे तख्त काबीज केलेले आहे. लो. टिळकांसारख्या किंवा स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या श्रेष्ठींचे रक्त माझ्या धमन्यांतून वाहत आहे, अशी अहंता माझ्या मनाला सुखवीत असे. त्या मानाने काळे कुरूप लुंगीवाले कोणत्या झाडाचा पाला आहेत असे वाटे. त्यांची क्षिती बाळगण्याचे कारण नाही, अशी ग्वाही मन देत असे.

परंतु नोकरीत जसजशी वर्षे गेली तसतशी या काळ्या लोकांची महती कळायला लागली. माझ्या पूर्वजांनी तलवारीच्या जोरावर दिल्लीपर्यंतची राज्ये काबीज केली असतील, गोऱ्या बाणगटांनी तराजूच्या जोरावर सारा भारत पूर्वी पादाक्रांत केला असेल, परंतु या लोकांनी, न बोलता, न जाहिरात करता, लेखणीच्या जोरावर, हिशेबाच्या बळावर, हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत स्वत:चे कारकुनी साम्राज्य

(Clerical Imperialism) स्थापन केले आहे हे लक्षात आले.

मद्रासी कारकुनाशी जास्त संबंध आल्यावर काही गोष्टी कळल्या. नोकरीसाठी भारतभ्रमण करणारे बहुतेक सर्व मद्रासी ब्राह्मण असतात. ते उत्तम इंग्रजी बोलतात. छानदार 'ड्राफ्टस' लिहितात. परंतु घरात अत्यंत प्रतिगामी असतात. त्यांच्याकडे सामाजिक सुधारणांची चळवळ अजून फारशी झालेली नाही. मद्रासी पुरुष अजूनही घरात सुलतानासारखा असतो. त्याची अर्धांगी बिचारी बऱ्हंशी अशिक्षित असते आणि खालच्या मानेने घरात वावरते. संतती-नियमनाच्या तो अगदीच विरुद्ध असतो आणि प्रत्येक घरातील अपत्य-संख्या कमीत कमी पाच ते सात असतेच. अठराव्या शतकातील धर्मनिष्ठ ब्राह्मणाप्रमाणे कर्मकांडाचे आचरण त्याच्या घरात होत असते. उत्तमांगाला भस्म लावल्याशिवाय तो घराबाहेर पडत नाही. नोकरीच्या निमित्ताने सर्व जगभर भ्रमण करूनही स्वतःच्या सामाजिक जीवनात तो 'शैव' आणि 'वैष्णव' यांच्या मारामाऱ्या लढण्याचा कंटाळा करीत नाही, हे मी बघितले आणि माझे मन थक्क झाले. पंजाबी, सिंधी, उत्तर प्रदेशीय किंवा बंगाली कारकुनांपेक्षा हा माणूस अगदी निराळा असतो. फाईलींच्या गराड्यात आणि आकड्यांच्या गोंधळात तो रस घेतो. 'हरिभजन समाजात' जाऊन दररोज जपजाप्य करणे, हा पदवीधर मद्राशाचादेखील छंद असतो. ऑफिसात काम करताना दिवसाच्या कोणत्या क्षणी 'राहूकाल' लागतो याची तो नोंद ठेवतो, आणि त्या कालात महत्त्वाच्या कागदपत्रांवर सह्या न करण्याची किंवा साहेबाच्या खोलीत न जाण्याची तो दक्षता घेतो. मांसभक्षण करण्याची कल्पनादेखील मद्रासी कारकुनाच्या मनाला शिवत नाही. जास्तीत जास्त खुशीत आल्यावर मसाला किंवा रवा डोसा खाणं ही त्याची चैनीची व्याख्या असते. अशा मद्रदेशियांबद्दल आत्मीयता वाटणे जवळ जवळ अशक्य असते. तिकडे जाऊन निरीक्षण करण्याची कल्पना त्यामुळेच मला प्रथम हास्यास्पद वाटली.

पण जास्त विचार केल्यावर चूक लक्षात आली. इकडे येणारे मद्रासी हे काही झाले तरी परदेशी असतात. स्वतःचा प्रांत, स्वतःची माणसे सोडून उदरभरण करण्यासाठी गुरख्यांची किंवा भैय्यांची आयात आपल्याकडे होत असते. मुंबईपुण्याच्या कोपऱ्या कोपऱ्यांवर इराण्यांची उपाहारगृहे असतात. कौंटरवर मागे बसलेल्या इराण्याकडे बघून सबंध इराणी जनतेबद्दल आपण कल्पना करू शकतो का? मग मद्रासी कारकुनावरून सबंध मद्रदेशाविषयी मत बांधणे विसंगत नव्हे का?... एखाद्या प्रांतात प्रत्यक्ष गेल्याशिवाय तेथील वातावरण नीट कळणे शक्य होते का?... मनात अनेक प्रश्न भिरभिरले.

आसपासच्या लोकांजवळ मी चौकशी केली. कुणालाच विशेष काही माहिती नव्हती. मद्रदेशात प्रत्यक्ष जाऊन आलेली माणसे फारच कमी होती. तेथील राजकारणी व्यक्तींबरोबर निकटचा परिचय कुणाचा नव्हता. एस. एम. जोशी,

नानासाहेब गोरे, वगैरे पुढाऱ्यांना भेटून पत्रे मिळविण्याचा प्रयत्न केला. पण उपयोग झाला नाही. '' साधना 'च्या यदुनाथ थत्त्यांनी काही पत्ते दिले. ' बृहन् महाराष्ट्र परिषदे 'कडून आणि ' आंतर भारती ' संस्थेकडून काही माहिती मिळविली. पण ती फार तोकडी होती. स्वत:च्या देशातील एका प्रांतात आम्ही चाललो होतो. पण जवळ जवळ परदेशात जात असल्याचा भास झाला.

तिकिटे मिळविण्यासाठी त्रास पडला. परंतु आम्ही तिघे पंधरा एप्रिलला दुपारी बारा वाजता कसेबसे गाडीत चढलो. वि. ग. कानिटकर हे फार व्यवस्थित गृहस्थ आहेत. त्यांची सर्व तयारी अद्ययावत होती. पुंडलिक विसरभोळे आहेत. प्रत्येक ठिकाणी स्वत:च हरवणारे आहेत. शेवटपर्यंत ते गाडीची वेळ कशी गाठतील याचीच चिंता होती. मी मध्यमार्गी आहे. व्यवस्थितपणा आणि अव्यवस्थितपणा यांच्या मधला दुवाच आहे. प्रवासासाठी हे त्रिकूट आदर्श ठरावे.

गाडी सुरू झाली आणि मी शोधक नजरेने आसपासच्या प्रवाशांकडे बघितले. गाडी महाराष्ट्रातून चालली होती. पण डबा मात्र मद्रास प्रांतात होता. डाव्या बाजूला दोन मोठे बाक व्यापून एक ऐसपैस मद्रदेशी कुटुंब बसले होते, लुंगी नेसलेला ताडमाडासारखा सरळसोट उंच असलेला, डोळ्यांवर उपनेत्र ठेवलेला एक मध्यमवयीन माणूस न कळणाऱ्या भाषेत मुलांवर आणि बायकोवर खेकसत होता. ' एखाद्या पितळी डब्यात बरेचसे खडे घातले आणि झाकण बंद करून ते वाजवले म्हणजे जसा आवाज येतो, तसा कानडी भाषा बोलणाऱ्यांचा येतो, ' असे माधवराव जोशांनी आपल्या एका नाटकांत लिहिले आहे. पत्र्यावर पावसाच्या सरी पडाव्यात त्याप्रमाणे त्या माणसाच्या तोंडचे शब्द बाहेर पडत होते आणि मला हसू येत होते...ही कानडीच का ?...छे ! !...ही कानडी नाही !...ही तामिळ आहे...पण तामिळच कशावरून ? मल्याळम् का नाही ?... काहीच कळेना. मी पुंडलिकांना विचारले. त्यांनी एकंदर तालमाल बघून रामराव डिटेक्टिवाच्या



अवसानात ती तामीळच आहे असा शोध लावला. वि. ग. कानिटकरांना तर तामीळ नावाची भाषा देशात अस्तित्वात आहे हे मुळी माहीत नव्हते. अशा तऱ्हेने जी कडकड वाजते ती मल्याळम् भाषा असते, असं त्यांनी मत दिलं. मी मात्र सर्व प्रवासभर त्या कुटुंबाकडे बघत होतो... बाई कुरूप होती. दोन्ही नाकपुड्यांत चमकी होत्या. अंगावर भडक पातळ होतं. भोवती पाच-सात मुलांनी फेर धरला होता. थोडीशी रात्र पडल्यावर त्या गृहिणीने कालवलेला भात डब्यातून काढला आणि केळीच्या पानांतून प्रत्येकाला दिला. बाराव्या तेराव्या दिवशी पिंड वळावेत त्याप्रमाणे त्या प्रत्येकानं भाताचे पिंड मनसोक्त मळले आणि लांबूनच तोंडात टाकले. त्या क्रियेकडे बघून मला किळस आली. परंतु ते कुटुंब पिंडावर ताव मारीतच राहिले आणि संपल्यावर त्यांनी थर्मासमधील कॉफी काढली आणि ते काळपट पेय ती सर्व मंडळी मजेत पीत राहिली. त्या कुटुंबावरची नजर काढून मी माझ्यासमोरच्या बाकाकडे बघितले. एक नीटस काळसर चेहऱ्याचा तरुण आणि त्याची टपोऱ्या बोलक्या डोळ्यांची आडव्या बांध्याची सुरेख स्त्री! तिथे सगळाच व्यवस्थितपणा होता. एकच एक लहानसं गोजीरवाणं मूल होतं. बाटलीतलं दूध होतं. छोटासा वातीचा स्टोव्ह होता. मस्का लावलेले पावाचे काप होते. मुलाला झोपवून ती दोघे बागेत फलाहार करावा त्या थाटात न्याहरी करत होती. त्यांच्याकडे बघणं सुखदायक होतं. पण सदभिरुचीच्या दृष्टीनं ते योग्य नव्हतं. काहीतरी बोलायला हवं होतं. त्यांच्या पेटीवर 'कलकत्ता' ही अक्षरे दिसली; म्हणून मी इंग्रजीत विचारले, "कलकत्त्याहून आलात काय?" तो माणूस अबोल असावा. काही बोलण्याची त्याची इच्छा नसावी. कोरड्या आवाजात त्यानं सांगितलं, "नाही, मी पुण्याच्या ॲम्युनिशन फॅक्टरीत असतो...पूर्वी इशापूरला होतो." त्याला बोलायला लावण्याचा आम्ही खूप प्रयत्न केला परंतु ते शक्य झालं नाही. त्याची बायको तर नुसतीच आमच्याकडे टप्पोऱ्या डोळ्यांनी



बघत राहिली. तिनं चार शब्द बोलावेत अशी इच्छा होती. पण तसं कुठलं व्हायला ! शेवटपर्यंत तिचे नुसते डोळेच बोलत होते. बोलण्याच्या ओघात एवढंच कळलं की तो माणूस केरळ प्रांतीय आहे. रजा घेऊन स्वतःच्या घरी तो चाललेला आहे.

आम्ही वर्तमानपत्राचे बातमीदार आहोत. मद्रास प्रांतातील बदललेली परिस्थिती अभ्यासण्यासाठी जात आहोत, असे पुन्हा पुन्हा मोठमोठ्याने सांगितले. परंतु त्या जोडप्यावर इष्ट तो परिणाम झाला नाही. कोणत्याही तऱ्हेच्या शब्दांची देवाण-घेवाण करण्यास ते तयार नव्हते. केरळ प्रांतीय माणूस स्वतःमध्येच रमणारा, काहीसा अबोल आणि कुढ्या स्वभावाचा असतो असं मला उगीचच वाटलं.

परंतु आमची ' बातमीदारी ' त्या लुंगीधारी काळ्या मद्राशावर मात्र परिणाम करती झाली. जेवण आटोपून लुंगीला तोंड पुसून तो आता इंडियन एक्स्प्रेस वाचण्यात गढला होता. त्याने पेपर मिटला आणि आमच्याकडे बघत हेल काढणाऱ्या इंग्रजीत म्हटले, " हे काम फार चांगलं आहे. मद्रासमध्ये तुम्हांला खूप बघायला मिळेल. " इतके लांबून बोलून त्याचे समाधान झाले नाही. तो समोर येऊन बसला आणि भडा-भडा बोलायला लागला. संभाषणाच्या ओघात कळले की तो ' डिफेन्स अकौंट्स'-मधील एक अधिकारी आहे. त्यानं आपली सारी हयात पुण्यात काढली आहे. रास्ता पेठेत त्याचा चार खोल्यांचा ब्लॉक आहे. मुलं सरस्वती विद्यालयात शिकतात. त्या सर्वांना मराठी उत्तम समजते. पुण्याबद्दल आणि महाराष्ट्राबद्दल एकूणच त्याचे मत चांगले दिसले. मुलांना घेऊन तो तिरुपतीच्या दर्शनाला जात होता; परंतु महा-राष्ट्रात स्थायिक व्हावं, अशी त्याची इच्छा होती.

त्याचे नाव बालसुंदरम् आहे, असे कळल्यावर मी मुद्दामच खोचून प्रश्न केला, " म्हणजे तुम्ही ब्राह्मण आहात ? "

त्याच्या हेल काढणाऱ्या इंग्रजीत त्यानं सांगितलं, " यस् यस्. आय अॅम अ ब्राह्मीन...व्हाय डु यू डाऊट ? "

मी हसलो आणि म्हणालो, " ब्राह्मण आहात म्हणूनच तुम्हांला इकडे स्थायिक व्हावेसे वाटते...ब्राह्मणेतर लोक तुम्हांला आता तिकडे टिकू देणार नाहीत... म्हणूनच तुम्हांला परप्रांत आवडतो."

तो क्षणमात्र चमकला व आम्ही त्याच्यावर ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाविषयीच्या प्रश्नाची सरबत्ती केली.

त्याने इकडे तिकडे घाबरल्या नजरेने पाहिले व आम्हांला विचारले, " तुम्हीही ब्राह्मणच आहात ना ? "

आम्ही होकार दिल्यावर त्याला विश्वास आला व तो तेथील ब्राह्मणेतरांविषयी तावातावाने बोलायला लागला. रामस्वामी नायकरांनी ब्राह्मणेतर चळवळीची स्थापना केली. आणि हिंदू देवदेवतांची विटंबना आरंभिली. त्या वेळेपासून मद्रासेत

ब्राह्मण समाजाला स्थान नाही असं त्यांचं मत पडलं. तिथं ब्राह्मणांना नोकऱ्या मिळणे जवळ जवळ अशक्य आहे, असे त्याने सांगितले.

तोच धागा उचलून पुंडलिकांनी त्याला विचारले, " रामस्वामी नायकरांपेक्षा हल्लीची अण्णा दुराई यांची पार्टी जास्त निरोगी आहे किंवा कमी जातीयवादी आहे असं तुम्हांस वाटत नाही का ? "

त्या माणसाला स्वतःची अशी राजकीय मते नसावीत. नोकरी करणारा माणूस नेहमी सत्तारूढ पक्षाच्या पाठीशी असतो, या न्यायानं काँग्रेसचं राज्य त्याला बरं वाटत असावं. परंतु त्यातही एक तिढा होता. चक्रवर्ती सी. राजगोपालाचारी यांनी अण्णा दुराईला आशीर्वाद दिला होता. डी. एम. के. बरोबर स्वतःचे उमेदवार उभे केले होते. त्यामुळे डी. एम. के. ला नावं ठेवणं त्याला तितकंसं इष्ट वाटत नव्हतं. राजगोपालाचारींच्या मुत्सद्देगिरीवर त्याचा विश्वास होता. त्यामुळे त्याने कबूल केलं, " राजाजींनी ही स्टेप मोठ्या शहाणपणानं घेतली आहे...यामुळे ब्राह्मण-ब्राह्मणेतरांतील तेढ कमी होईल. शेवटी राजाजीच अण्णा दुराईपेक्षा जास्त शहाणे ठरतील. "

ब्राह्मण-ब्राह्मणेतर प्रश्नाशिवाय त्याने अनेक प्रश्नांवर मते दिली. मध्यवर्ती सरकारकडून ' मद्रासची नेहमी उपेक्षा होत आली आहे...हिंदी आमच्यावर लादली जात आहे...तीन पंचवार्षिक योजना झाल्या, पण आमच्या प्रांताची वाढ उद्योग धंद्याच्या दृष्टीनं मुळीच झाली नाही...पोट भरण्याकरता आम्हांला देशांतर करावे लागते...वगैरे गोष्टी त्याने सुनावल्या. मद्रासमधील सामान्य, सुशिक्षित ब्राह्मण वर्गाचा तो माणूस प्रतिनिधी आहे असं मला वाटलं...

गाडी चाललीच होती. स्टेशने मागे पडत होती...महाराष्ट्र संपला...आंध्रही संपला. ...डोंगरावर मोठमोठे शिलाखंड स्वतःचे अंग सावरीत अगदी छोट्याशा आधारानं उभे असल्यासारखे दिसायला लागले. थोडासा धक्का जरी लागला तरी ते प्रचंड शिलाखंड कोसळतील आणि पृथ्वीचा चेंदामेंदा करून टाकतील अशी भीती वाटली. कुणीतरी म्हणाले, की ते प्रचंड दगड म्हणजे काँग्रेस सरकारांची प्रतिकृतीच होत !...केव्हा कोसळतील याचा नेम नाही. कोसळल्यावर स्वतःच्या पक्षाबरोबर देशाचाही चक्काचूर केल्याशिवाय राहणार नाहीत. ते उद्गार मला पटले असे नव्हे, परंतु मी विमनस्क होऊन त्या कलंडल्या शिलाखंडांकडे र च ळ बघत राहिलो हे मात्र खरे.

हळूहळू ते दृश्यही मागे पडले. आसपासच्या साऱ्या सृष्टीचे स्वरूप एकदम बदलले. शेतावर हिरवी कोवळीक दिसायला लागली. डब्यात उकडत होते, पण बाहेरचा निसर्ग बघून डोळे सुखावत होते...गाडी तामीळनाडमधून चालली होती. डब्यात आता सगळीकडे मद्रदेशीयच झाले होते. स्टेशनांची नावे इंग्रजी स्पेलिंग-वरून उच्चारणे कठीण जात होते. कालवलेल्या दहीभाताची केळीच्या पानांत

ज्वलंत राष्ट्रवादाच्या

भयानक दीप्तीचा

ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

**राजहंस प्रकाशन,**

४१९ नारायण पेठ, पुणे २.

बांधलेली ' पार्सले ' विकली जात होती...चहा कुठल्या स्टेशनवर गडप झाला हे कळलेच नाही. सगळीकडे काळपट कॉफीचे साम्राज्य पसरले होते. डब्यातल्या माणसांपैकी कोणाचेच बोलणे कळत नव्हते...आम्ही खरोखरच परदेशात आलो होतो.

वालसुंदरम् रेणीगुंठाला खाली उतरला. मग आणखीनच मोकळे मोकळे वाटायला लागले. मेनन दंपतीवर कितीही पाणी घातले तरी त्यांची कळी उमलणे शक्य नव्हते. बाहेरचा निसर्ग बघत बसण्याशिवाय इलाजच नव्हता.

मद्रास यायला तास-दोन तास उरले. मग आम्ही निरीक्षणाची दिशा ठरविली. तिघांनी बसून प्रश्न काढले...' स्वतंत्र द्रविडस्तानाच्या कल्पनेला जनतेचा कितपत पाठिंबा आहे. ? ...हिंदी भाषेस मद्रासी लोकांचा इतका विरोध का ?...हिंदी नको असेल तर प्रांताप्रांतातील व्यवहारासाठी ' लिंक लँग्वेज ' म्हणून कोणती भाषा यावी ?...द्रविड मुन्नेत्र कळघमचा इतक्या प्रचंड प्रमाणात जय कसा झाला ?... त्यांनी संघटना कशी बांधली ?...संघटनेचे खास वैशिष्ट्य कोणते ?...कॉंग्रेसचा इतका फजितवाडा का उडाला ?...पराभवाची खास कारणे कोणती ?...केंद्र सरकारकडून मद्रासवर उद्योगधंद्याच्या बाबतीत खरोखरच अन्याय झाला आहे का ?...तामीळनाडमधील ब्राह्मण-बाह्मणेतर वादाचे स्वरूप कोणते ?...तामीळ भाषेतील सध्याच्या ललित लेखनाची प्रगती कुठपर्यंत आहे ?...अनेक प्रश्न मनात उभे राहिले. त्यांची उत्तरे मिळविण्यासाठी आठ-दहा दिवसांच्या वास्तव्यात जिवाचे रान करण्याचे आम्ही ठरवले.

प्रश्न मनात भिरभिरत होते, इतक्यात गाडी मद्रास स्थानकात शिरली. खिडकी-बाहेर आम्ही तोंडे काढली तेव्हा सडसडीत आटोपशीर बांध्याचे, बोलक्या चेहऱ्याचे एक गृहस्थ बाहेर उभे होते. त्यांनी शुद्ध मराठीत विचारले, " पुंडलिक जोशी, आणि कानिटकर तुम्हीच का ?"

आम्ही होय म्हणून सांगितल्यावर त्यांनी स्वतःची ओळख करून दिली. त्यांचे आडनाव लिमये होते. मायर्स पंप कंपनीचे ते एक मोठे अधिकारी आहेत. त्यांना माजगावकरांचे पत्र गेले होते. आम्हांला उतरवून घेण्यासाठी ते आले होते.

त्यांच्याबरोबर स्टेशनच्या बाहेर पडलो आणि आलिशान मोटारीतून व्हेपरी विभागातील रूंडॉल स्ट्रीटवरील महाराष्ट्र समाजाच्या भव्य इमारतीत पोचलो.

राहण्याची व्यवस्था उत्तम होती. पण मने स्थिर नव्हती. प्रश्नांची भुते पाठलाग करीतच होती. (अपूर्ण)

# गफूरमियाँ

"अरे, क्या बताऊ ?
अरे, ती गेली तर
या दुनियेत माझं काय आहे ?
गणपत,
इन्सान प्यार कर सकता है
सिर्फ एक औरतपर."

य. सं. कर्णिक

श्रावणी सोमवारचा उपवास सोडल्यानंतर गप्पा मारण्यासाठी मी गफूरमियाँच्या घरी गेलो. फार दिवसांत त्यांची माझी भेट झाली नव्हती. त्यांचा मुलगा मध्यंतरी दोनदा माझ्या घरी येऊन निरोप ठेवून गेला होता, पण कामामुळे मला त्यांचेकडे जायला सवड मिळाली नव्हती.

मी घरात शिरलो तेव्हा गफूरमियाँ कोणावर तरी ओरडत होते. त्यांचा पारा चांगलाच चढलेला दिसत होता. तरुणपणी धिम्या वृत्तीचा असलेला हा गृहस्थ मध्यमवयात चिडखोर बनत चालला होता. त्यांची बायको गेली अनेक वर्षे अंथरुणास खिळून पडलेली होती. त्यामुळे होणाऱ्या मानसिक त्रासाचाच तो परिणाम असावा.

माझा आणि गफूरमियाँचा स्नेह फार जुना. लहानपणापासूनची मैत्री. तसं म्हटलं

तर वयानं मी त्यांच्याहून थोडासा लहानच. पण ते मला आपला मित्र मानत आणि बरोबरच्या नात्याने वागवत.

माझ्या अस्तित्वाची जाणीव करून देण्याकरिता चपला पायांतून काढत मी मोठ्याने म्हणालो,

" गफूरसाहेब ! आहात काय घरात ? "

त्यांचं ओरडणं एकदम बंद झालं. दिवाणखान्यात येत ते म्हणाले,

" कोण, गणपत ? आव, आव. किती दिवसांनी आलास. बालबच्चे सगळे ठीक आहेत ना ? "

मी सर्वांची खुशाली सांगितली, त्यांची विचारली आणि सतरंजीवर लोडाला टेकून बसलो. तेही बाजूला तक्क्याला टेकले आणि त्यांनी विचारलं,

" लौकर आलास वाटतं घरी आज ? "

" होय. उपास सोडायचा होता. रोज येईन–येईन म्हणत होतो. पण जमेचना. निरोप मिळाला मला तुमचा. "

" हां हां. मी दोनदा धाडला होता युसूफला तुझ्याकडे. अरी मेहरुन, गणपत-चाचाके लिये चाय बनाव." मघेच त्यांनी मुलीला चहा करण्याचं फर्मान सोडलं आणि पुन्हा माझ्याकडे वळून ते म्हणाले, " हां. तर युसूफला सांगितलं, बेटा, तुझ्या गणपतचाचाला म्हणावं जरा भेटून जा. पण तूही येईनास. मग वाटायला लागलं, इस जमानेमें हमारा कोई है या नहीं ? "



मी माझी चूक कबूल करून माफी मागितली आणि म्हणालो, " गफूरसाब, आपण इच्छा कराल तेव्हा मी इथं हजर आहे, असं समजा. "

" हां हां. मला माहीत आहे ते. तेरा बडा भाई असाच दिलदार होता. गेला बिचारा. अल्लाची मर्जी ! तू त्याचाच भाऊ, म्हणून तर दिवसातून चारदा तुझी याद येते. "

मी काही बोललो नाही. माझ्या वडील भावाचा आणि गफूरमियांचा असाच दाट स्नेह होता. माझा भाऊ आजारी होता तेव्हा ते दिवसातून चार वेळा तरी घरी येऊन त्याची चौकशी करून जात. तो वारला त्या वेळी त्यांनी केलेला शोक माझ्या अद्यापि स्मरणात होता.

इतक्यात त्यांची सगळ्यात धाकटी मुलगी मेहरुनिसा चहाचे कप घेऊन बाहेर आली. मुलगी देखणी आणि उफाड्याची होती. माझ्या मुलीची मैत्रिण होती.

चहाचे घुटके घेत गफूरमियाँ म्हणाले,

" हल्ली दिल लागत नाही कशात माझं, गणपत. "

" का ? काय झालं ? "

" झालं काही नाही. " त्यांनी एक सुस्कारा सोडला आणि उरलेला चहा एका दमात पीत ते पुढे म्हणाले, " जीनेमें कुछ मजा नहीं रहा. "

त्यांची व्यथा मी समजू शकत होतो. त्यामुळे काही बोललो नाही.

मग त्यांनी बैठकीखालची सिगारेटची पेटी काढली आणि त्यातली ' चारमिनार ' पेटवत ते म्हणाले,

" आमचे बापजादे ह्याच दिवाणखान्यात इथे बैठकीवर बसून हुक्का पीत. हुक्का प्यायला दम लागतो. आमच्यात तो नाही. म्हणून आम्ही बिडी–सिगारेट प्यायला लागलो. काय ? "

मी नुसताच हसलो.

" तेरा ठीक है. ना सिगरेट पीनेकी, ना गोष्त खानेका. सुपारी तरी खातोस की नाही ? "

" हो खातो ना. "

मग त्यांनी मुलीला पुन्हा हाक मारून पान–सुपारीचं तबक आणायला सांगितलं.

सिगारेट संपेपर्यंत मग ते माझ्याशी काही बोलले नाहीत. कसला तरी विचार करत सिगारेटचे झुरके घेऊ लागले. मी पानाच्या शिरा काढू लागलो.

" गणपत, " तंद्रीतून एकदम भानावर येत ते म्हणाले. " लढाईनंतर जमाना सगळा बदलून गेला, नाही ? "

" हो, तर " मी मत दिलं. " जुनं काही राहिलं नाही आता. "

" लेकिन, तुला काय वाटतं ? पुराना जमाना अच्छा था की नहीं ? "

" केव्हाही. " मी होकारार्थी मान हलवली. " रुपायाला सहा शेर तांदूळ

मिळायचे. गहू तर रुपायाला—"

"ते नाही म्हणत मी. अरे, माणसाला तेव्हा दानत होती."

मी वरमलो. मला पुराना जमाना आवडत होता तो त्या वेळच्या स्वस्ताईमुळं. पण मी आपला म्हणालो, "गेले ते दिवस गफूरसाहेब. आता चारसोबीस लोकांचे दिवस आले."

"अरे, काय ते दिवस. त्या वेळचा दुष्मनसुद्धा आता प्यारा लागतो. त्या वेळी धर्म होता माणसाला. हिंदू हिंदूसारखा वागायचा. मुसलमान मुसलमानासारखा वागायचा."

मला त्या वेळचे हिंदू–मुसलमानांचे दंगे आठवले. पण काही बोललो नाही. फक्त 'खरं आहे, खरं आहे' अशा अर्थी मान हलवीत राहिलो.

इतक्यात मशिदीवरून बांग ऐकू आली. गफूरमियाँ उठत म्हणाले,

"गणपत, जरा ठेरो हां. अखबार वाचत बैस. मी जरा नमाज पढतो. जाऊ नको हां."

त्यांनी मग खुंटीवरचं एक वस्त्र ओढलं. ते जमिनीवर नीट पसरून त्यावर ते उभे राहिले. हातांनी प्रथम कानांना स्पर्श केला व नंतर दोन्ही हात पुढे आडवे धरून, ईश्वराचं नामस्मरण करीत ते नमाज पढू लागले.

मी मनात म्हटलं, चला, आज आपणही जरा देवाचं स्मरण करूया. म्हणून मनातल्या मनात शंकराचं स्तोत्र म्हणू लागलो.

नमाज पुरा झाल्यानंतर गफूरमियाँ एकदा घरात जाऊन आले. त्यांनी परत सिगारेट पेटवली.

हां! तर काय सांगत होतो तुला? जमाना सगळा बदलून गेलाय्. आमच्या बापजाद्यांनी धर्म सांभाळला म्हणून आम्ही इथे येऊन पोचलो. आमची औलाद काय धर्म सांभाळणार?"

मी नकारार्थी मान हलविली.

"आता तूच सांग गणपत, तू बालबच्चेवाला माणूस आहेस. बायको आहे. अच्छी है बेटी! कमजोर है. दवा–बिवा खिलवत असशील. तिला अंडी खिलवत जा व तगडी कर. तर काय म्हणत होतो? हां. बायको आहे. मुलगी आहे. काय नाव तिचं?"

"सुमन."

"हां. सुमन, आमच्या मेहरूनच्या वर्गात आहे. बडी प्यारी लडकी है. शादी–बादी केव्हा करतोस तिची?"

"बघू या. अजून लहान आहे. शिकते तोपर्यंत शिकवायची."

"हेच चुकतं तुम्हा माणसांचं. अरे, लडकी म्हणजे जळती मशाल. जास्ती दिवस घरात ठेवणं म्हणजे धोका. ज्या त्या घरी पोचती झालेली बरी. का होय

की नाही."

"खरं आहे!"

"मेहरूनची शादी करून टाकणार आहे मी ह्या मोसमात. बहेनका लडका है. अच्छा है. ते जाऊ दे. तर मी काय म्हणत होतो?"

गफूरमियाँ काय म्हणत होते ते मला आठवेना. आढ्याकडे नजर लावून ते म्हणाले,

"काही तरी म्हणत होतो नाही?"

"होय. जमाना बदलला वगैरे काहीतरी बोलत होतात."

"हां, बरोबर. तर गोष्ट अशी की आपण आपल्या धर्माप्रमाणे वागलं पाहिजे. होय का नाही?"

"अगदी खरं."

"आता तुम्ही हिंदू. तुमच्यात पूर्वी चाहेल तितक्या वेळा ब्याह करायचे. भगवान श्रीकृष्णाला हजारो बायका होत्या. काय खरं का नाही?"

"होय. अगदी बरोबर."

"आता कानून झाला. एका बाईच्यावर बाई करायची नाही."

"झाला खरा."

"झाला कसा? तुम्ही करू दिला म्हणून झाला. अरे, हा माणसाचा खाजगी मामला. उद्या म्हणतील एकाच्यावर पोर नाही झालं पाहिजे. ऐकाल का तुम्ही?'

"ते काय आपल्या हातांत आहे?" काहीतरी बोलायचं म्हणून मी बोललो.

"तर सरकारनं असा गैरदिमाग कानून का करावा? आता तुला सांगतो. आमच्यातसुद्धा आहेत असे पागल लोक. लांब कशाला? माझ्या बहेनोजीचीच गोष्ट घे. बडी बहेनका शौर. तू ओळखतोस त्यांना."

गफूरमियाँचे मेहुणे डॉ. अक्रमसाहेब हे एक शिक्षणतज्ज्ञ व पुरोगामी विचारांचे गृहस्थ होते.

"आता एवढा फॉरेनला जाऊन आला पण काही दिमाग आहे काय त्याला? वाचले असशील तू अखबारमध्ये. चार पोर-टोरं घेऊन एक फंड काढलंय आता त्यानं. म्हणे मुसलमानांना पण हा एक बायकोचा कानून लागू करा."

गाडी ह्या विषयावर आल्यावर मला थोडं अवघडल्यासारखं झालं.

"कारे बाबा! तुमच्या बापजाद्यांनी चार बायका केल्या म्हणून काही बिघडलं का ह्या दुनियेचं?"

ते माझ्यासमोर हातवारे करून बोलू लागले. मी अपराधी मुद्रा करून बसलो होतो. जणू ह्या मागणीमागे माझीच प्रेरणा होती.

"अरे, कुराणशरीफसारखा कानून आलम दुनियेत नाही."

मी 'अगदी बरोबर आहे,' ह्या अर्थी मान हलवली.

" का, तुला काय वाटतं ?"

आता मी कुराणशरीफवर काय मत देणार ? पण म्हणालो,

" मोठा पवित्र ग्रंथ तो. "

" अरे, पवित्र म्हणजे काय ; वाचून बघ. तुला समजणार नाही. उर्दूत आहे मीही काही वाचला नाही. अरे, आम्ही तरी कुठे उर्दू शिकलो ? मराठी शाळेत शिक्षण झालं आमचं. सुबोध विद्यालयमध्ये. गणपुले मास्तर. अरे, क्या बुढ्ढा सिखाता था. इतक्या शाळा बदलल्या मी. शंभर मास्तर झाले. पण याद येते गणपुले मास्तरची. असा मारायचा, असा मारायचा, की क्या कहूँ ? मी मार खाल्लेला आठवतो तुला ? फार वर्षे झाली. आठवत नसेल कदाचित. "

मला तो प्रसंग चांगलाच आठवत होता. गफूरमियाँच्याच नव्हे तर माझ्याही आयुष्यात क्रांतिकारक बदल करणारा तो प्रसंग होता. तो विसरून कसं चालेल ? पण गप्पांची गाडी फार लांबू नये म्हणून म्हणालो,

" गणपुले फार प्रेमळ. असे मास्तर मिळायचे नाहीत आता. "

" आता कसले मिळतात! ती दुनियाच वेगळी होती गणपत. मास्तर शिकवायचे, मारायचे, जवळ घ्यायचे. ऐसे प्यारे बुढ्ढे थे उस जमानेके. आता काय सगळंच बदललं. "

ही गप्पांची गाडी कोठे जाणार याचा मला अंदाज लागेना. मी बसल्या-बसल्या चुळबूळ करू लागलो.

" तर तुला सांगत होतो की आमचे काही पागल लोक म्हणतात की कानून करा. "

" पण बरेच लोक त्यांना विरोधही करणार आहेत असं ऐकतो. "

" त्यांना कोण विचारतो रे ? म्हणतील बुढ्ढी आहेत. पुराने ख्यालातली आहेत. एक बायको पुरत नाही काय म्हणून विचारतील. काय चांगली जबान आहे म्हणतोस काय त्यांची ?"

मग मी 'कायदा व्हायला फार वर्षे लागतील; सरकार तसं काही घिसाडघाईनं करणार नाही, धार्मिक भावनांचा प्रश्न आहे ' वगैरे नेहमीच्या चार गोष्टी सांगून त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. तेही खुष झाले.

" वो तो सही, वो तो सही " असं म्हणत दाढी कुरवाळू लागले.

मी घड्याळ पाहिलं. आठ वाजायला आले होते. बायको-मुलांना घेऊन सिनेमाला जायचा मी बेत केला होता. म्हणून उठत म्हणालो,

" निघतो मी आता. पुन्हा येईन केव्हातरी. "

" अरे, घाई कसली आहे ? खाना खाओगे क्या ?"

" नाही. मी जेवलो. उपवास सोडला. "

" ठीक है. ठीक है. जातोस तर ?"

" हो. "

" जा. पण हां ! गणपत, तुला निरोप पाठविला पण काम सांगायचं विसरलोच."

" काय ?"

" तुझ्या ओळखीचा कोणी वैद्य आहे का रे ?"

" वैद्य कशाला गफूरसाहेब ?"

" दवा पाहिजे. "

" कोणाला ?"

" तुझ्या भाबीला रे. डॉक्टर झाले, हकीम झाले. पण काही गुण येत नाही. कोणीतरी म्हणालं, वैद्याचा दवा घेऊन बघा."

माझ्या माहितीचा कोणी वैद्य नव्हता. पण चौकशी करण्याचं मी गफूरमियाँना आश्वासन दिलं.

" हां मेहेरबानी करून कुठे सापडतो का बघ."


ते मला दाराजवळ पोचवायला आले. बाहेर पायरीवर येताच त्यांनी एकदम माझा हात घट्ट धरला आणि रुद्ध कंठाने ते म्हणाले,

" गणपत, ती जगावी म्हणून मी माझी जान कुर्बान करायला तयार आहे रे. मला मदत कर."

त्यांना धीर द्यायची इच्छा असूनही माझ्या तोंडून शब्द बाहेर फुटेना.

" अरे, क्या बताऊ ? ती गेली तर या दुनियेत माझं काय आहे ? गणपत, इन्सान प्यार कर सकता हैं सिर्फ एक औरतपर. "

त्यांच्या डोळ्यांतून अश्रू एकदम घळघळ वाहू लागले. माझ्यापासून ते लपविण्यासाठी त्यांनी माझा हात सोडला आणि घरात शिरता शिरता " लाइलाहे इल्लिल्ला...असं म्हणत ते देवाची आळवणी करू लागले. ●



# यक्षप्रश्न

## एक पदरी जीवनाचा संथ आविष्कार

• वि. शं. पारगावकर

‘ यक्षप्रश्न ’ ही पु. वि. बेहेरे यांची पहिलीच स्वतंत्र कादंबरी. ‘ मेनके ’चे संपादक म्हणून बेहेरे यांचे नाव वाचकांना परिचित आहेच; आता कादंबरीकारा म्हणूनही ते आपला परिचय वाचकांना करून देत आहेत.

ही कादंबरी त्यांची पहिलीच असली तरी तिचे लेखन एखाद्या पट्टीच्या सराईत लेखकाप्रमाणे झालेले आहे. शैलीतील साधेपणा आणि विषयाला धरून वाहणारा भाषेचा ओघ यांचे गणित बेहरे यांना चांगले जमलेले आहे.

तिचा विषय साधा, अनेकांना परिचित असलेला आहे. आणि तोदेखील फारच साधा आणि अगदीच कमी गुंतागुंतीचा आहे. एखाद्या ललितकृतीचा विषय साधा आणि अनेकांनी अनेक वेळा हाताळलेला जरी असला तरी पण जातिवंत लेखकाला त्याचेही आव्हान असू शकते. बेहेरे यांनी असे धाडसी आव्हान ‘ यक्षप्रश्ना ’च्या बाबतीत स्वीकारलेले दिसत नाही.

अरुण नावच्या तरुणाशी सुनंदा नावाच्या एका तरुणीचे लग्न होते. सुनंदा

अत्यंत सुंदर असते. ( कादंबरीतली स्त्री—नायिका सुंदर असायला पाहिजे, नाही का ? ) आणि अरुण साधा, अंगमर केसांची आयाळ असलेला आणि आपल्या पत्नीविषयी कौतुक आपुलकी नसलेला. त्यातही आश्चर्याची गोष्ट अशी की, सुनंदाला मागणी घातलेली असते. आणि परस्वाधीन जीव म्हणून सुनंदाला त्याच्याशी अनिच्छेने लग्न करावे लागते !

ही झाली कादंबरीच्या कथानकाची सुरुवात.

नंतर सुनंदाच्या आयुष्यात हेमंत सबनीस नावाचा श्रीमंत, सुंदर तरुण येतो. ती घरातल्या एकांताला कंटाळून नोकरीसाठी बाहेर पडते आणि हेमंतच्या ऑफिसात हेमंतच तिला लावून घेतो. अर्थातच हेमंत हा दु:खी तरुण असतो. त्याचे दु:ख म्हणजे त्याची बायको साधीभोळी, अशिक्षित असते. तिचं त्याला आकर्षण वाटत नाही. आणि एका बाळंतपणात ती आजारी पडते जी ती अंथरुणाला खिळूनच असते. सुनंदाला नवऱ्याचे सुख नसते आणि हेमंतला बायकोचे नसते ! अर्थातच दोघांना एकमेकांपासून सुख मिळणे ही गोष्ट ओघानेच आली.

मग सुनंदा आणि हेमंत यांच्या अगोदर चोरून, आणि नंतर भावना अनावर झाल्यामुळे राजरोस भेटी सुरू होतात. सिनेमा, हॉटेले आणि जुहूचा किनारा त्यांच्या प्रेमाला अपुरा पडतो म्हणून मग हेमंत लोणावळ्याला आपल्या एका मित्राच्या बंगल्यात सुनंदाला दर शनिवारी घेऊन जातो.

पुढे या साऱ्या व्यवहाराचे जे पर्यवसान व्हायला हवे असते ते होते. शरीरसंबंध आल्यामुळे सुनंदाला हेमंतपासून दिवस जातात. आणि अरुणला, तिच्या नवऱ्याला हे सारे समजते.

पु. वि. बेहेरे यांनी पुढचा प्रश्न सोडविला नाही. म्हणूनच त्यांनी कादंबरीला ' यक्षप्रश्न ' हे नाव दिले असणार !

थोडक्यात म्हणजे परपुरुषाशी संबंध असणाऱ्या एका सुंदर स्त्रीची ही कथा आहे. खऱ्याखुऱ्या अर्थाने ही एक कथाच आहे. पुस्तकाच्या पृष्ठसंख्येवरूनही आणि विषयाच्या आवाक्यावरूनही तसेच म्हणणे भाग आहे.

एक विवाहित तरुण आणि एक विवाहित तरुणी यांच्या असंतुष्ट जीवनातील लैंगिक व्यवहाराची ही कथा आहे. जीवनात निर्माण झालेले एक साधे एकेरी पद्धतीने त्याचे चित्रण केले गेले आहे. एखाद्या नाटकात एखाद्या पात्राच्या फक्त चेहऱ्यावर प्रकाशझोत टाकून त्याचा तेवढाच अभिनय दाखवितात, तशी जीवनातील फक्त या एकाच प्रसंगावर बेहेरे यांनी आपल्या कथेची उभारणी केलेली आहे. यानिमित्ताने जीवनातील इतर अनेक भावनांचे, प्रसंगांचे, परिस्थितीचे आणि अपरिहार्यतेमुळे निर्माण होणाऱ्या अटळ व्याकुळतेचे पदर त्यांना जोडता आले असते तर या कथेला कदाचित वजन लाभले असते.

आता जे चित्रण हाती आले आहे ते फक्त स्थूल घटनांचे, लैंगिक व्यवहारांतून

प्रादुर्भूत होणाऱ्या एकच एक प्राथमिक आकर्षणाचे आणि त्यापासून निष्पन्न होणाऱ्या एकच एक परिणतीचे !

तरीही पण वाचकांचे जे हाती लागते ते मननीय नसले तरी वाचनीय खास आहे. एकदा ही कादंबरी वाचावयास सुरुवात केली की ती अखेरपर्यंत वाचीत नेल्याशिवाय आपल्याला गत्यंतरच उरत नाही ! बेहेरे यांची भाषा आणि प्रसंगामधून प्रसंग निर्माण करण्याचे कसब त्यांना चांगलेच अवगत आहे. शिवाय प्रसंगांच्या गुणधर्मांप्रमाणे भाषेचा चढउतार आणि संयपणा त्यांना चांगलाच साधलेला आहे.

कादंबरीच्या लेखनात काही तांत्रिक चुका अनवधानाने राहून गेल्या असल्या तरी त्या गौण आहेत. कादंबरी वाचून संपविल्यावर वाचकाच्या मनात जी प्रतिक्रिया उमटते ती खऱ्या अर्थाने महत्त्वाची असते आणि तीच प्रतिक्रिया खरी असते.

तशी ही कादंबरी बेहेरे यांच्या वाचकांना आवडेल, असे वाटते. ●

यक्षप्रश्न : पु. वि. बेहेरे
मेनका प्रकाशन
मूल्य ३ रु. : पृ. ११२ (पुणे)


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये


राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.



१ मे १९६५. मॉस्कोतल्या लाल चौकात कामगारांचे संचलन पाहण्यासाठी परदेशी नागरिकांची गर्दी झाली होती. हिमकण अंगावर घेत अनिमिष नेत्रांनी मीही तो सोहळा पाहत होतो. क्रेमलिनच्या पिवळ्या भिंतीलगत उभारलेल्या भव्य व्यासपीठावर कोसिजिन्, ब्रेझनेव्ह आदी सोव्हिएट नेते कामगारांच्या मानवंदनेचा स्वीकार करीत होते.

चार-एक तास हा कार्यक्रम चालू होता. त्यानंतर लाल चौकातील गर्दी हळूहळू विरळ होऊ लागली. त्या गर्दीतून मार्ग काढीत मी पुढे गेलो आणि लेनिनच्या शवपेटिकेपाशी पोहोचलो. साऱ्या जगावर कामगारांची अधिसत्ता निर्माण करण्याचे स्वप्न पाहणारा आधुनिक रशियाचा हा शिल्पकार आपल्या मानचिन्हांसह तेथे पहुडला होता. नारिंगी रंगाच्या प्रकाशझोतामुळे तेथील वातावरणाला गडद गांभीर्य प्राप्त झाले होते.

लेनिनच्या समाधीमागेच १९१७ च्या राज्यक्रांतीत भाग



घेतलेल्या अन्य रशियन नेत्यांची स्मारके आहेत. प्रत्यक समाधीवर त्या त्या क्रांतिवीराचा अर्धाकृती पुतळा पाहावयास मिळतो. शेवटचे स्मारक मात्र ओकेबोके आहे. साधा दगड आणि त्यावर 'जोसेफ स्टॅलिन–१८७९ : १९५३' एवढी अक्षरे. बस्स. यापेक्षा अधिक काही नाही. या स्मारकापाशी परदेशी प्रवाशाने काही काळ थांबणे हेही जवळच उभ्या असलेल्या रशियन पोलिसांना नामंजूर असावे. 'आतला क्रेमलिनचा परिसर पाहा ना.' असे मला एका पोलिसाने सुचविले. प्रारंभी झारच्या आणि नंतर स्टॅलिनच्या वास्तव्या-मुळे गाजलेल्या त्या परिसरातून हिंडताना मनात नानाविध विचार येत होते. स्टॅलिन येथे जवळ जवळ पंचवीस-तीस वर्षे राहिला. सत्ता आपल्या हाती ठेवण्यासाठी त्याला किती तरी हत्याकांडे करावी लागली. मध्यंतरी दुसऱ्या महायुद्धाचा विकट कालखंड येऊन गेला. हिटलरच्या फौजांनी रशियाच्या गळ्याभोवतालचा फास आवळत आणला होता. धीरगंभीर

पुरुषही हादरून जावा अशा एकामागून एक अनेक घटना घडल्या. परंतु स्टॅलिन कधीच क्रेमलिनबाहेर पडला नाही. आज मात्र येथे त्याची पुसटती खूणही पाहावयास मिळत नव्हती.

लाल चौकाच्या कडेलाच उभे असलेले लेनिन संग्रहालय पाहिले. रशियात साम्यवादी राजवट प्रस्थापित करण्याच्या स्वप्नाने भारून गेलेल्या या क्रांतिवीराच्या जीवनाशी संबंधित असलेल्या अनेक वस्तु आणि छायाचित्रे येथे अतिशय जपून ठेवण्यात आली आहेत. परंतु येथेही आपणांस पाहावयास मिळतो तो केवळ लेनिन. क्रांती जणू काही त्याने एकट्याने केली असाच भास व्हावा.

मे-दिनाच्या निमित्ताने साऱ्या मॉस्को शहरभर मार्क्स, एंगल्स आणि लेनिन यांची रेखाचित्रे फडकत होती. काही ठिकाणी ब्रेझनेव्ह, कोसिजिन आणि सध्याच्या सूत्रधारांची छायाचित्रेही पाहावयास मिळत होती; परंतु येथेही ट्रॉटस्की दिसत नव्हता, स्टॅलिन दिसत नव्हता, क्रुश्चेव्हही दिसत नव्हता. या संबंधात बरोबरच्या मार्गदर्शकाला प्रश्न विचारला तेव्हा तो म्हणाला, " ते काय जनतेचे नेते होते ? " मला या पोपटपंचीची मोठी गंमत वाटली.

जनता ! जनता ! म्हणजे नेमके कोण ? आणि तिचे हित कशात आहे, अहित कशात आहे हे ठरवावयाचे कोणी ? मॉस्कोतली सारी जनता संचलनात सहभागी झाली होती, हाही अनुभव नवा होता. दिल्लीतला पहिला प्रजासत्ताकदिन मला अद्यापही आठवतो. त्या दिवशी राजधानीच्या उत्साहाला सीमा नव्हती. राष्ट्रपति-भवनासमोरची ती भव्य मिरवणूक भारताचे आनंदी मनोगत व्यक्त करीत होती. परंतु तरीही राजधानीतील सारी जनता त्या मिरवणुकीत सहभागी झालेली नव्हती. बहुसंख्य जनता प्रेक्षकच होती. येथे मॉस्कोत मात्र माझ्यासारखे परदेशी पाहुणे हेच काय ते

प्रेक्षक. बाकी सारी जनता अंग गोठवून टाकणाऱ्या बर्फवृष्टीतही आपल्या तीन-चार वर्षांच्या मुलामुलींना फरफटत या मिरवणुकीत सहभागी झालेली. या मिरवणुकीत उत्साह अमाप होता; पण संचलनाची शिस्त मुळीच दिसत नव्हती.

एका दिवसात बरेच काही पाहावयास मिळत होते. दुपारची वेळ झाली तेव्हा मार्गदर्शकाला म्हटले, "मला तुमचा ग्रामीण भाग पाहायचाय."

"आज देशभर सुटी आहे. त्यामुळं आपल्याला काहीही पाहता यायचं नाही. पण तुमची इच्छाच असेल तर टॅक्सीतून हिंडून येऊ या."

मॉस्कोतून आमची टॅक्सी बाहेर पडली आणि उत्तरेच्या रोखाने धावू लागली. मी मार्गदर्शकाला बरेच काही विचारत होतो. एखाद्या विद्यार्थ्याने धडा वाचावा अशी त्याची उत्तरे देण्याची पद्धत होती. त्याला अवघड वाटणारे प्रश्न तो खुबीने टाळत होता. मला मात्र एवढेच खचित जाणवत होते की इतिहासाची काही पाने फाडली जात आहेत. काही नव्या पद्धतीने लिहिली जात आहेत.

व्होल्गाच्या खोऱ्यातून हिंडताना मनाला बरे वाटत होते. मध्येच विश्रांतीसाठी व्होल्गाच्या तीरावर आम्ही दोघं विसावलो. मार्गदर्शक म्हणाला, "तुम्हा भारतीयांची जशी गंगा तशीच आमची ही व्होल्गा. आमची संस्कृती जन्म पावली, विकासली ती हिच्याच काठावर!"

मला राहुल सांकृत्यायन यांच्या 'व्होल्गा ते गंगा' या पुस्तकाची आठवण झाली.

संध्याकाळच्या धूसर प्रकाशात व्होल्गाचा प्रवाह उदासवाणा वाटत होता. त्या प्रवाहाकडे पाहत असताना मनात विचार आला की विसाव्या शतकातील एका महान् घटनेचा साक्षीदार असलेल्या व्होल्गाची निश्वसिते जाणून घेण्याचा केव्हा तरी प्रयत्न केला पाहिजे.........................

# व्होल्गा

वि. स. वाळिंबे

व्लादिमिर शाळेतून धावत धावतच घरी आला. वाटेत एक-दोन मित्रांनी त्याला हटकले; पण तो थांबला नाही. त्याला घरी पोचावयाची घाई होती. केव्हा एकदा आईला ती बातमी सांगतो असे त्याला होऊन गेले होते. घरापाशी येऊन पोचला तेव्हा तो इतका दमलेला होता की, क्षणभर तो तेथेच थबकला. आतापर्यंत आई केव्हा भेटते असे त्याला होऊन गेले होते; पण आता पायांतले सारे त्राणच गेल्यासारखे झाले होते. त्याचा भेदरलेला चेहरा पाहून मारिआ अॅलेक्झांड्रोव्हना चपापली. हातांतले काम बाजूला सारत तिने विचारले. " व्लादिमिर, काय झालंय रे ? "

" आपल्या अॅलेक्झांडरला पकडलंय ! "

" अॅलेक्झांडरला पकडलंय ? कुणी आणि कशासाठी ? " टेबलावर मूठ आपटत मारिआने विचारले.

" झारच्या खुनाच्या कटाबद्दल. "

" तुला कुणी सांगितलं ? "

" आमच्या वर्गातल्या काश्काडोमोव्हानं. तिच्या वडिलांना पीटर्सबर्गमधल्या मित्राचं पत्र आलंय तेच तिनं मला वाचायला दिलं. झारचा खून करण्याचा कट केल्याच्या आरोपावरून पंधरा जणांना पकडण्यात आलंय. त्यात अॅलेक्झांडरचं नाव पाहिलं आहे, असं त्या पत्रात म्हटलंय. " व्लादिमिरने सारी माहिती एका दमात सांगून टाकली.

हे सारे ऐकल्यानंतर मारिआ चपापली. टेबलाचा आधार घेत ती खुर्चीवर बसली. गेल्याच वर्षी तिच्या नवऱ्याचे—इल्या निकोलायचे—निधन झाले होते. त्या आघातातून ती स्वतःला कशीबशी सावरत आहे तोच हे नवे संकट दत्त म्हणून उभे राहिले. आता काय करायचे याचा ती विचार करू लागली. काहीही झाले तरी मुलाच्या सुटकेसाठी प्रयत्न केलाच पाहिजे, असे ठरवून तिने पीटर्सबर्गला जाण्याचा बेत आखला.

सिंबर्स्क ते पीटर्सबर्ग हा प्रवास अतिशय त्रासदायक आहे हे तिला माहीत नव्हते असे नाही; पण आपल्या थोरल्या मुलासाठी तेवढा त्रास आता सहन करायला हवाच होता. व्होल्गाच्या काठावर उभ्या असलेल्या या छोटेखानी गावामधून पीटर्सबर्गला जायचे म्हणजे सिझरानपर्यंत बोटीने जायला हवे. कारण सिझरानहूनच पीटर्सबर्गची गाडी मिळणार होती. परंतु सध्या थंडीचे दिवस असल्यामुळे व्होल्गाच्या

# जेव्हा लाल होते

प्रवाहावर वर्फाचे जाड थर साठले होते व त्यामुळे बोटी बंद होत्या. अशा परिस्थितीत सिंबर्स्क ते सिझरान हा प्रवास घोड्यावरून करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. हेही करण्यास मारिआची तयारी होती. परंतु तिची अपेक्षा एवढीच होती की हा अवघड प्रवास आपल्या एकटीला करावा लागू नये. दोन-चार गावकऱ्यांनी तरी आपल्याबरोबर पीटर्सबर्गला यावे. तिची ही अपेक्षा काही चूक नव्हती. कारण उल्यानोव्ह कुटुंबाला सिंबर्स्कमध्ये मानमान्यता होती. गणित आणि विज्ञान विषयांचा कुशल शिक्षक म्हणून सिंबर्स्कचा परिसर तिच्या नवऱ्याला ओळखत होता. व्लादिमिरचा जन्म होण्याच्या आदल्या वर्षी इल्या निकोलाय यांना शिक्षण खात्यात बढती मिळून ते साऱ्या इलाख्याचे शाळा-तपासनीस झाले होते. तेव्हापासून गेल्या वर्षी निधन होईपर्यंत ते याच जागेवर काम करीत होते. त्यामुळे सिंबर्स्कमधल्या प्रतिष्ठित कुटुंबांमध्ये उल्यानोव्ह कुटुंबाचा समावेश झालेला होता.

परंतु आपल्या मृत नवऱ्याची प्रतिष्ठा आता मारिआच्या मदतीसाठी येण्यास तयार नव्हती. इल्या निकोलाय गेले आणि त्याबरोबरच गावकरी त्यांच्या कुटुंबियांना विसरले. त्यातच या असल्या खुनी मुलाच्या आईबद्दल सहानुभूती दाखविणे म्हणजे आपण होऊन राज्यकर्त्यांच्या रोषाला निमंत्रण देण्यासारखे होते ! परंतु यामुळे मारिआ निराश झाली नाही. फासाच्या दोरखंडातून आपल्या मुलाची मान सोडविण्यासाठी ती एकटीच सिंबर्स्कहून निघाली. सिझरानपर्यंतचा तापदायक प्रवास पुरा केल्यानंतर तिला तेथे पीटर्सबर्गकडे जाणारी गाडी मिळाली. डब्यात बरीच गर्दी होती; परंतु कोणाशी बोलावे असे मारिआला वाटत नव्हते. डोळे मिटून घेऊन ती पीटर्सबर्गला गेल्यानंतर काय करायचे, कोणाला भेटायचे, या विचारांत बुडून गेली. तिला सारखी अॅलेक्झांडरची आठवण येई व आठवणीसरशी तिचे डोळे पाणावत. शेजारच्या बाईने एकदा तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करून पाहिला, परंतु तिच्या प्रश्नाला उत्तर देताना मारिआच्या तोंडून फक्त हुंदकाच बाहेर पडल्यामुळे पुढे काहीच बोलणे झाले नाही.

मारिआला एकूण सहा मुले होती. त्यांतला अॅलेक्झांडर सर्वांत मोठा. त्याला नुकतेच एकविसावे वर्ष लागले होते. आता लवकरच तो नोकरीधंद्याला-संसाराला लागेल, अशी मारिआची अपेक्षा होती. इल्या निकोलाय यांच्या मृत्युनंतर ती याच आशेवर जगत होती. परंतु घडले होते ते वेगळेच ! कॉलेज-शिक्षणासाठी पीटर्सबर्गला गेल्यापासून अॅलेक्झांडर क्रांतिकारकांच्या सहवासात रमू लागला होता.

सुटीत तो सिंबस्र्कला येई तेव्हाही तो आपल्या जुन्या सवंगड्यांशी क्रांतीचीच चर्चा करी. आपल्या थोरल्या भावाची आणि त्याच्या मित्रांची ही चर्चा व्लादिमिर मोठ्या उत्सुकतेने ऐकत असे. या चर्चेच्या वेळी अॅलेक्झांडरच्या चेहऱ्यावर जो आवेश दिसून येई त्याकडे व्लादिमिर आकृष्ट झाला होता. अॅलेक्झांडरसंबंधी त्याच्या मनात आदराची भावना निर्माण, झाली होती. परंतु क्रांतीची चर्चा करणाऱ्या अॅलेक्झांडरची झारचा खून करण्याच्या प्रयत्नांपर्यंत मजल जाईल याची मात्र व्लादिमिरला मुळीच कल्पना नव्हती. कारण सिंबस्र्कला ओला की रात्रीच्या वेळी तेथील क्रांतिकारक प्रवृत्तीच्या मित्रांच्या सहवासात वावरणारा अॅलेक्झांडर दिवस-भर घरी बसून आपल्या अभ्यासाच्या पुस्तकांच्या वाचनात गर्क असायचा. प्राणी-शास्त्र हा तर त्याच्या खास आवडीचा विषय. गेल्या वर्षीच्या परीक्षेत तर त्याने या विषयातले पीटर्सबर्ग विद्यापीठातले पारितोषिक मिळविलेले होते. त्यामुळे जेव्हा केव्हा घरी अॅलेक्झांडरसंबंधी विषय निघे तेव्हा व्लादिमिर म्हणायचा, "अॅलेक्झांडर क्रांतिकारक चळवळीत प्रत्यक्ष भाग घेईल असं मला मुळीच वाटत नाही. गेल्या सुटीत तो घरी आला असताना दिवसभर डोळ्यांपुढे मायक्रोस्कोप घेऊन कसलेतरी प्रयोग करीत बसला होता. छे: ! हा कसला क्रांतिकारक होतोय ? असल्या पुस्तकी अभ्यासात वेळ घालवयाला सच्च्या क्रांतिकारकाला सवड असते कुठं ? "

परंतु गेल्या वर्षभरात अॅलेक्झांडरने प्रयोगशाळेतील मायक्रोस्कोप बाजूला फेकला असून तो बाँब तयार करण्यात गढून गेला आहे हे व्लादिमिरला माहीत नव्हते. या काळात अॅलेक्झांडरला क्रांतीच्या विचारांनी अक्षरश: झपाटले होते. त्याच्या बोलण्यात सारखा तोच विषय यायचा. तो म्हणायचा, कोणत्या औषधाने कोणता रोग बरा होतो हे ज्याला माहीत नाही तो डॉक्टर काय होणार ? तसेच आहे हे. आजच्या सामाजिक आणि राजकीय अन्यायाला नेमकं कोण जबाबदार आहे हे ज्याला उमगत नाही तो क्रांतिकारक तरी कसा होणार ?

अॅलेक्झांडरच्या विचारांची दिशा निश्चित झाल्यानंतर तो 'जनतेच्छा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या क्रांतिकारक गटात दाखल झाला होता. इतकेच नव्हे तर या गटाच्या पीटर्सबर्गमधल्या युवक शाखेचे नेतृत्व त्याच्याकडेच आले होते. १८८७ साल उजाडायच्या सुमारास हा एकवीस वर्षांचा तरुण आपल्या क्रांतिकारक मित्रांना सांगू लागला, "मित्रांनो, सहा वर्षांपूर्वी म्हणजे १ मार्च १८८१ या दिवशी त्या वेळच्या झारचा खून करण्यात आला होता. येत्या १ मार्चला आपण त्याच्या मुलाचा खून करून आपण क्रांतीच्या मार्गावरचं आपलं पाहिलं पाऊल टाकू या."

या संकल्पाप्रमाणे झारचा खून केल्यानंतर रशियन जनतेला उद्देशून जी घोषणा करावयाची तिचा मसुदाही अॅलेक्झांडरने तयार करून ठेवला होता. त्याने या पत्रकात म्हटले होते-' रशियन भूमीचे तेज अद्यापही कायम आहे हेच आम्ही सिद्ध केलेले आहे. या तेजाची धग या भूमीच्या सुपुत्रांनी आपल्या हृदयात जतन केली

आहे. आमच्या हृदयातील ही धग, ही आग आता कोणीही विझवू शकणार नाही-- या आगीत पहिला बळी पडेल तो जुलूमशाहीचा आणि म्हणूनच या जुलूमशाहीचे प्रतीक असलेल्या झारचा, दिनांक...१८८७ रोजी खून करण्यात आला आहे.'

१ मार्चचा हा बेत पक्का झाल्यानंतर अॅलेक्झांडर आणि त्याचे सहकारी झारच्या हालचालींसंबंधी माहिती मिळवू लागले. झार नेहमी मे--जूनच्या सुमारास क्रिमियातील आपल्या वसंत-प्रासादात राहावयास जात असे. या वर्षी तो लवकरच तिकडे जाणार असल्याची बातमी क्रांतिकारकांपासून लपून राहू शकली नाही. त्यामुळे जे काही करावयाचे ते तातडीने करणे आवश्यक होते. झार पीटर्सबर्गमधून बाहेर जाण्याच्या आतच अॅलेक्झांडरला आपला बेत पार पाडावयास हवा होता. झार राजवाड्यातून बाहेर केव्हा पडतो, याचीच आता तो वाट पाहू लागला. दररोज सकाळ झाली की, अॅलेक्झांडर आणि त्याचे दहा-पंधरा सहकारी नेव्हस्वी प्रॉस्पेक्टवरच्या चौकात बाँब व पिस्तुले घेऊन दबा धरून बसत. परंतु झार काही राजवाड्याबाहेर येईना. त्यामुळे दिवसभराच्या श्रमाने हे तरुण कंटाळून जात व शिकार हाती लागत नाही म्हणून निराश मनःस्थितीत आपल्या गुप्त कचेरीत परतत. खरी गोष्ट अशी होती की अॅलेक्झांडरच्या या बेताचा पोलिसांनाही अर्धवट सुगावा लागलेला होता आणि त्या आधारेच त्यांनी राजवाड्याबाहेर न पडण्याचे झारला कळविले होते. 'जनतेच्छा' गटाच्या कचेरीभोवती गुप्त पोलिसांची टेहळणी सुरू झाली. मधूनच एखादा साध्या वेषातील पोलिस पहिल्या मजल्यावरच्या पक्ष-कचेरीत येऊन दाखल होई व परगावच्या अडाण्याचे सोंग घेऊन दोन-चार खुबीचे प्रश्न विचारी. पोलिसांचा हा त्रास इतका वाढला की अॅलेक्झांडर आणि त्याचे सहकारी सायंकाळी पक्ष-कचेरीत जमण्याऐवजी पीटर्सबर्गबाहेरच्या जंगलात जमू लागले. त्यामुळे तर पोलिसांचा संशय अधिकच बळावला. शेवटी एके दिवशी त्यांनी अॅलेक्झांडरला धरलेच. त्याच्या झडतीत जे कागदपत्र सापडले त्यामुळे पोलिसांना अनेक क्रांतिकारकांची नावे व पत्ते कळाले. ही यादी हातांत पडताच पोलिसांचे काम फार सोपे झाले. लागलीच ठिकठिकाणच्या क्रांतिकारकांची धरपकड करण्यात आली. यांपैकी काही जणांनी पोलिसांच्या अमानुष छळाला कंटाळून कबुलीजबाब लिहून दिले. त्या आधारे पोलिसांनी अॅलेक्झांडरसह पंधरा जणांवर झारच्या खुनाचा कट केल्याचा आरोप ठेवला !

पीटर्सबर्गला पोचल्यानंतर आपल्या मुलाची भेट घेता यावी यासाठी मारिआने खूप खटपट केली. परंतु या मोठ्या शहरात तिची कोणीच दाद घेईना आणि मुलाला भेटल्याशिवाय सिंबर्स्कला परतायचे नाही असा तर तिचा निर्धार होता. त्यामुळे पीटर्सबर्गमधले पोलिस अधिकारी आपली दाद घेत नाहीत असे आढळून येताच मारिआने सरळ झारलाच पत्र लिहिले. ते वाचताच झारने बंदीपालाला कळविले,

मारिआला मुलाची भेट घेण्याची परवानगी द्यावी. म्हणजे आपल्यो दिवटचा चिरंजिवांच्या मनात कोणते विचार येत आहेत याची या माउलीला एकदा नीट कल्पना येईल.

झारच्या हुकमानुसार मारिआला अॅलेक्झांडरची भेट घेण्याची अखेर परवानगी मिळाली. आईला पाहताच त्याला गहिवरून आले. डोळे पुसत अॅलेक्झांडर म्हणाला,

" आई, माझ्यामुळे तुला खूप त्रास झाला. होय ना ? तू माझ्यावर खूप रागावली असशील. पण आई झारच्या जुलूमशाहीतून देशाची मुक्तता करण्याचं मी व्रत घेतलं. यात माझं काहीं चुकलं का ?"

" ते सारं खरं आहे, अलेक्झांडर, " मारिआ म्हणाली, " पण तुझे मार्ग भयंकर आहेत. फार भयंकर. बहुधा तुला परिणामाची पर्वा नसावी."

" पण आई, मी स्वीकारलेल्या मार्गाशिवाय दुसरा मार्ग शिल्लकच उरलेला नाही." अॅलेक्झांडरच्या स्वरांत निर्धार होता. आवेश होता.

त्याच्याशी आता अधिक बोलण्यात अर्थ नाही, हे मारिआने जाणले. 'देव तुझा सांभाळ करो,' असे पुटपुटत ती बाहेर पडली.


खुनाच्या कटाची अॅलेक्झांडरकडून तपशीलवार माहिती मिळविण्यासाठी पोलिसांनी जंगजंग पछाडले, पण त्याने मौनव्रत स्वीकारले होते. पोलिसांच्या दंडुक्याचे पाठीवर रट्टे बसत असतानाही त्याच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडेना. आपल्याशिवाय इतर कोणालाही या खटल्यात शिक्षा होऊ नये हीच त्याची इच्छा होती व त्यासाठी हे मौनव्रत आवश्यक होते.

प्राथमिक चौकशी पुरी झाल्यानंतर पोलिसांच्या कडक बंदोबस्तामध्ये खटल्याचे कामकाज सुरू झाले. अॅलेक्झांडरला आणि त्याच्या चौदा सहकाऱ्यांना न्यायालयात आणण्यात आले तेव्हा बाहेर बरीच गर्दी जमली होती.

" तुला वकील द्यायचाय का ?" न्यायाधिशाने विचारले.

" मीच माझा वकील आहे !" अॅलेक्झांडर उत्तरला.

न्यायालयाला उद्देशून तो सांगू लागला, " माझ्या देशबांधवांची झारशाहीच्या जुलुमातून सुटका व्हावी याच एका उद्देशाने मी झारच्या खुनाचा बेत आखला; कारण ज्या राजवटीत उच्चार स्वातंत्र्याच्या नरडीला नख लागते आणि आपल्या प्रगतीसाठी व सुखासाठी वैध मार्गाने प्रयत्न करण्याचा नागरिकांचा अधिकार छिनावून घेतला जातो तेथे पिस्तुल किंवा बॉंब हाच काय तो आमच्यासारख्या क्रांतिकारकांचा आधार ठरतो. झारच्या राजवटीशी उघड झुंज घेणे आम्हांला सर्वस्वी अशक्य आहे ! कारण या राजवटीच्या पाठीशी अमाप सेनासामर्थ्य उभे आहे आणि आम्ही मात्र दुर्बल आहोत. त्यामुळे ज्या कोणाला न्यायाची चाड व अन्यायाची चीड असेल त्याला पिस्तुल हाती घेतल्यावाचून दुसरा मार्गच उरलेला नाही



सन्माननीय अन्त

झारच्या जुलमी राजवटीला सशस्त्र क्रांती हेच उत्तर देण्याचे आम्ही ठरविले आहे. जनतेचे मूलभूत राजकीय स्वातंत्र्य जर तिला मिळवून द्यायचे असेल तर अनुसरलेला मार्गच बरोबर आहे अशी माझी श्रद्धा आहे."

आपल्या सहकाऱ्यांकडे अंगुलिनिर्देश करून ॲलेक्झांडर म्हणाला, " या साऱ्यांना माझ्याबरोबर निष्कारण गोवण्यात आलेले आहे. हे सारे माझे सहकारी असले तरी माझ्या या बेताची त्यांना मुळीच कल्पना नव्हती. त्यामुळे तुमच्या दृष्टीने मी जो गुन्हा केलेला आहे, त्याची संपूर्ण जबाबदारी माझ्या एकट्यावर आहे. म्हणून माझे न्यायालयाला एकच सांगणे आहे की, तुम्हांला जी काय शिक्षा द्यायची आहे ती मला एकट्याला द्या. मी मृत्यूला भीत नाही. कारण आपल्या देशबांधवांसाठी मरण पत्करण्याइतका क्रांतिकारकांच्या जीवनाचा दुसरा सन्माननीय अंत असू शकतो काय ?"

ॲलेक्झांडरच्या या जबाबाने व्हायचे तेच झाले. त्याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. परंतु आपण एकटेच दोषी आहोत हे त्याचे समर्थन मात्र न्यायालयाने मान्य केले नाही. ॲलेक्झांडरबरोबर इतर आठ जणांनाही फाशीची शिक्षा फर्माविली गेली. त्या सर्वांनी झारकडे दयेचे अर्ज केले. त्यांतील चौघांचे अर्ज मंजूरही झाले. हे पाहून मारिआने आपल्या मुलासाठी झारकडे दयेची याचना केली. आपल्या

आईने असा अर्ज केला आहे, याची अॅलेक्झांडरला बातमी कळताच त्याने कळवून टाकले– 'मला कोणाच्याही दयेची अपेक्षा नाही.' अॅलेक्झांडरच्या या पत्रामुळे मारिआचा अर्ज फेटाळण्यात आला. झारबद्दल अॅलेक्झांडरच्या मनात एवढा तिरस्कार होता की त्याला त्यापुढे आपल्या प्राणांचीही पर्वा नव्हती. रशियात जर झारशाही-विरुद्ध क्रांतीचा वणवा पेटवावयाचा असेल तर आपले बलिदान अपरिहार्य आहे अशीच त्याची धारणा होती. तो बंदीपालाला एवढेच म्हणाला, "आता माझे या जगातले थोडेच दिवस उरले आहेत. तेवढ्या अवधीत हेनचा कवितासंग्रह मला मिळवून द्याल काय ! मला तुमच्याकडून सवलत हवी आहे ती एवढीच."

८ मे १८८७ रोजी इलसेलबर्गच्या किल्ल्यात अॅलेक्झांडरला आणि त्याच्या चार सहकाऱ्यांना फाशी देण्यात आले. दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांत या बातमीला बरीच प्रसिद्धी देण्यात आली होती.

व्लादिमिरने ही बातमी वाचली तेव्हा त्याने दोन्ही हातांनी आपले डोके गच्च धरून ठेवले. आतली मेंदूची काच तडकल्यासारखे काही तरी झाले होते. वीज-प्रवाहाचा धक्का लागताच सारे शरीर पेटून उठावे तसा तो थरथरत होता. हातांतल्या वर्तमानपत्राचा चोळामोळा करून ते टाचेखाली घासत तो गरजला, "मी या अत्याचाराचा बदला घेणार आहे. अॅलेक्झांडरची प्रतिज्ञा मलाच पुरी केली पाहिजे."

शेजारच्या घरातील मारिआ सावेन्को व्लादिमिरजवळ उभी होती. तिला त्याच्या या बोलण्याचा काहीच अर्थबोध होईना. तिने विचारले, "व्लादिमिर, तू कुणाचा बदला घेणार आहेस ? तू हे काय बोलतोयस ? मला काही समजत नाही."

"जाऊ दे मारिआ." व्लादिमिर तिच्याकडे न बघताच तिला सांगत होता, "तुला ते समजण्यासारखं नाही. पण मला मात्र सारं काही समजलं आहे. मला माझा पुढचा मार्ग आता अगदी स्पष्ट दिसू लागलाय."

व्लादिमिर कितीतरी वेळ त्याच अवस्थेत उभा होता. आजूबाजूच्या जगाचे अस्तित्वच तो विसरला होता. सावेन्को निघून गेली हे देखील त्याला बरेच उशीरा कळले. ती निघून गेली हेच बरे झाले. कारण त्याला आता काही काळ तरी एकान्त हवा होता–

सतरा वर्षांचा व्लादिमिर इलिच उल्यानोव्ह लवकरच जगाला एका निराळ्या नावाने परिचित होणार होता,

ते नाव होते लेनिन.

[ अपूर्ण ]

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ सद्‌वर्तनाचा पेग

आधीच मर्कट तशातही मद्य प्याला म्हणजे तो आणखीच वेडे चाळे करू लागतो म्हणतात. माणसानेही फार घेतली की तो वागू नये तसे वागतो असा बोभाटा आहे. पण हा निव्वळ प्रचार आहे असे आता सप्रमाण सिद्ध झाले आहे. अमेरिकेत प्रकाशित होणाऱ्या एका विज्ञानविषयक मासिकात एका तज्ज्ञाने कोंबड्यावर लेख लिहिला आहे. त्यात एका सूचक प्रयोगाची माहिती दिली आहे. साधारणपणे कोंबडा हा कोंबडीच्या पिल्लांशी कठोरपणे वागतो. पण अशा काही कोंबड्यांना व्हिस्कीचा एक एक पेग पाजण्यात आला तेव्हा एकदम त्यांचे हृदयपरिवर्तन झाले व हे कोंबडे आपल्या प्रजेशी पित्याच्या वात्सल्याने वागू लागले. आता बोला ! कोपऱ्यावरच्या गुत्त्यात सद्‌वर्तनाचा पेग मिळू लागला तर विनोबांची हृदय-परिवर्तनाची चळवळ एका घोटात आटोपली असे म्हणायला काय हरकत आहे ? आता व्हिस्कीने पितृप्रेम जागृत होते तर बियरने निदान बंधुभाव पैदा व्हायला काहीच हरकत नाही. मला तर वाटते आता एखादा चाणाक्ष कलाल कुठल्या भावनेसाठी कुठली घ्यायला पाहिजे याचे कोष्टकच तयार करील. सर्वोच्च प्रतीचे स्वदेशप्रेम पाहिजे ? इम्पोर्टेड ब्रँडी घ्या. माणसा-माणसांतले सौहार्द पाहिजे ? जिन किंवा रम चालेल. गोर-गरिबांच्याबद्दल कनवाळूपणा पाहिजे ? एकच उपाय—हातभट्टीची.

## □ एक्स्प्रेस प्रेम

प्रेमाची भावना सामान्य म्हणजे ऑर्डिनरी नाही, तेव्हा ती फक्त एक्स्प्रेस तारेनेच व्यक्त होऊ शकते; पण मॉस्कोमधल्या तारखात्याला हे आतापर्यंत मान्य नव्हते, कारण " माझे तुझ्यावर किनई फार फार फार प्रेम आहे, " अशा आशयाच्या तारा मॉस्कोमध्ये रात्री अकरा वाजल्यानंतर घेतल्या जात नसत. पण 'प्रवदा' वर्तमानपत्राने या निष्प्रेम वागणुकीविरुद्ध चळवळ चालवून मॉस्कोच्या प्रेमिकांना एक्स्प्रेस प्रेम करण्याचा अधिकार मिळवून दिला असें नुकतेच वाचले. चला, बरे झाले. माणूस दहा ते पाच ऑफिसात जातो त्याप्रमाणे दहा ते पाच प्रेमाचे ऑफिस अवर्स ठरवले तर कारकून-कारकुनिकांची सोय सोडून बाकी सगळाच ब्रह्मघोटाळा व्हायचा; पण या सर्व प्रकरणी माझ्यासारख्या अनभिज्ञ माणसाला एक शंका येण्याजोगी आहे व ती म्हणजे प्रेमपत्राची सर प्रेमतारेला येईल काय ? कालिदासाच्या

आणि व्ही. शांतारामच्या शकुंतलेने कमलदलावर दुष्यंताला लिहिलेले प्रेमपत्र काय किंवा गोदूने गोंदूला गुलाबी कागदावर 'इव्हिनिंग इन् पॅरीस' सढळ हाताने शिंपडून लिहिलेले प्रेमपत्र काय, त्यातला तो गोड गोड मायना, त्यातली ती गुदगुल्या करणारी सही अन् सबंध पत्रातली अती मुलायम अर्थहीनता या सगळ्या गोष्टी मित-भाषी तारेत कशा येणार ?

## □ खिशात लपवलेला हत्ती

पैसे चोरीला जातात याचे मुख्य कारण ते आकाराने चोरण्याइतके लहान असतात अशी माझी आतापर्यंत भाबडी समजूत होती. रिस्टवॉच, फाउन्टनपेन इत्यादी गोष्टीही अशाच लंपास होतात. पण परवा वर्तमानपत्रांत वाचले की काही दिवसांपूर्वी दिल्लीत एक बस चोरीला गेली आणि बनारसला एक हत्ती चोरीला गेला ! आता बोला. हा हत्ती एका वरातीतला होता, तेव्हा वर अंबारीत बसलेल्या नवरदेवासकट तो चोरण्यात आला की काय याची चौकशी करावी लागेल. आणि दिल्लीची बस चोरीला गेली त्या वेळी आत किती पॅसेंजर झोपा काढीत होते याचा तपास केला पाहिजे. ते काही असो, नवीन रेल्वे मंत्र्यांना मी एक सावधगिरीची सूचना देऊ इच्छितो—रात्री सगळ्या आग-गाड्या नीट कडीकुलपात ठेवीत जा. ●

# उर्दू वार्ता

आजवर 'सेक्युलॅरिझम'चा उदो उदो करणाऱ्या आमच्या कॉंग्रेसने डॉ. झाकिर हुसेन यांची अध्यक्ष-पदी निवड करून आपल्या परीने या धोरणावर जणू शिक्कामोर्तबच केले आहे; परंतु जोपर्यंत भारतात अल्प-संख्याकांचे—विशेषत: मुस्लिमांचे—जीवित, वित्त आदींना धोका आहे, नव्हे तशी अनेक उदाहरणे निझामा-बाद, सेहून, सहारनपूर इत्यादी ठिकाणी घडत असताना भारत सरकारच्या या 'दिखाऊ' धोरणाला काय अर्थ आहे? बाकी मुस्लिमांना मोठमोठी पदे देण्यामागे सरकारचा उद्देश तरी अल्प-संख्याकांना प्रतिनिधित्व देणे, हा कोठे असतो ? स्वत:च्या निधर्मी धोरणाचा टेंभा जगभर मिरवायला अशी 'बाहुली' त्यांना हवी असतात इतकंच ! नाहीतर खुद्द कॉंग्रेसच्या अध्यक्षांचा झाकिर हुसेनना विरोध असतानाही त्यांची निवड कशी झाली असती ?

स्वत:च्या स्वार्थासाठी मूठभर मुस्लिमांना सत्तेचे आमिष दाखवून स्वत:च्या अंकित करण्यात केवळ सत्ताधारी कॉंग्रेस पक्षच आघाडीवर आहे, असं नव्हे ! सर्व विरोधी

# □ धर्मातीत धोरणाच्या प्रचारार्थ मुस्लिम अध्यक्ष ?

पक्षांनी–यात मुस्लिमांचा कट्टर विरोधक जनसंघही आला–उपाध्यक्षपदासाठी प्रो. हबीब यांचे नाव सुचविण्यामागे तरी दुसरा कोठला उद्देश होता ?

एरव्ही अध्यक्षांसारख्या महत्त्वाच्या पदावर एका अल्पसंख्याक–प्रतिनिधीची निवड होतीच ना ! कारण, अमेरिकेसारख्या देशातही प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक पंथीय लोक आपल्याकडच्या हिंदू–मुस्लिमांइतके परस्परांपासून दुरावलेले नसताही तेथे कॅथॉलिक पंथाचा अध्यक्ष निवडून यावयास दोन वर्षांचा प्रदीर्घ कालावधी जावा लागला ! तसेच सांसदीय लोकशाही असलेला सर्वांत जुना देश इंग्लंडनेदेखील कॅथॉलिक पंथाच्या व्यक्तीला पंतप्रधानपदी निवडण्याच्या दृष्टीने अद्याप काहीच प्रगती केलेली नाही ! हे असे का ? याचे कारण असे की, तेथे सेक्युलॅरिझमच्या कंठाळी घोषणांच्या गोंगाटात अल्पसंख्याकांचा 'आतला आवाज' दडपून टाकण्याची जरुरीच वाटत नाही; किंबहुना, तेथे कोणत्याही अल्पसंख्याक जमातीवर अन्याय होत असल्याचे उदाहरण नाही ! तेथील अल्पसंख्याकांचे जीवित, वित्तादी बाबी सुरक्षित आहेत !

आणि म्हणूनच आम्हांला मुस्लिम बांधवांना–विशेषत:, कॉंग्रेसच्या आमिषांना भुलून स्वत:ला अखिल भारतीय मुस्लिमांचे प्रतिनिधी म्हणवून मिरविणाऱ्यांना–असं सुचवायचं आहे, 'तुम्ही कोठल्याही पक्षाच्या प्रलोभनांना बळी पडलात तरी चालेल, परंतु स्वत:च्या समाजाच्या सर्वांगीण सुरक्षिततेची हमी त्यानं स्वीकारावी, अशी अट तरी किमानपक्षी संबंधितांवर लादा !'

नाहीतर परवाच्या सार्वत्रिक निवडणुकांत निव्वळ कॉंग्रेसला विरोध करावयाचा म्हणून उत्तर प्रदेशात मुशावरतने जनसंघाशी संधान बांधले–त्यांना विजय मिळवून दिला. आणि आता सत्तेवर आल्यावर तेच लोक उर्दूला विरोध करीत आहेत. म्हणजे शेवटी मुशावरतची 'हेचि फल काय मम तपाला ?' अशी विचित्र अवस्था झाली. तसं पाहता मुशावरतच्या धोरणात तरी कुठली एकवाक्यता वा सुसंगतता होती ? तिच्या काही ठिकाणच्या शाखांनी कॉंग्रेसला विरोध केला तर काही ठिकाणी पुरस्कार ! अशा या धरसोड धोरणाचे नेमके फळ वरीलप्रमाणे त्यांच्या पदरात पडले, यात विस्मय वा विशाद वाटण्याचे त्यांना तरी काय कारण ? मुशावरतने मुस्लिमांची एकंदर अवस्थाच परटाच्या त्या श्वानासारखी करून टाकली. जो ना घराचा ना घाटाचा ! अगदी उर्दू शायराच्याच शब्दांत सांगायचं म्हणजे–

ना खुदा मिला ना विसाले–सनम !

खरोखरच, मुशावरतच्या नादी लागून मुस्लिमांना धड परमेश्वरही पावला नाही अन् प्रियाही प्रसन्न करून घेता आली नाही ! मग प्रत्यक्ष मीलन तर दूरच.

हे उपरोक्त विचार एखाद्या जात्यंध कर्मठ, संकुचित वृत्तीच्या कोणा मुस्लिमाचे असावेत, असं तुम्हांला वाटलं ना ? नेमकं मलाही दिल्लीच्या 'परचम-इ-हिंद'च्या अंकातील हा लेख वाचताना तसे वाटले व म्हणून मी लेखकांच्या नावाकडे नजर वळवली तर दृष्टीस पडले-ॲडव्होकेट तेजबहादूर सिंहा ! सदर पत्राचे संपादक श्री. सय्यद अनीसुरहमान लेखकाच्या या मतांशी सहमत असतील वा नसतीलही ! तथापि स्वतः माझ्या माहितीतल्या सुशिक्षित अशा मुस्लिम बांधवांची प्रतिक्रियाही काहीशी वरील लेखकासारखीच असल्याचे मला तरी जाणवले. किंबहुना, अध्यक्षपदाच्या निवडणुका पार पडण्याआधीच्या संमिश्र प्रतिक्रियांमधून तर डॉ. झाकिर हुसेन केवळ मुस्लिम आहेत म्हणून त्यांची निवडच होणार नाही, असा हा सूर कानांवर पडला.

म्हणजे एकूण काय, तर मुस्लिम उमेदवाराला डावललं तरी तो मुस्लिम म्हणून व वर चढवलं तरी मुस्लिम म्हणूनच; हा रोगट, विकृत दृष्टिकोन !

आपल्या या विचारसरणीचा पुरस्कार व आपल्या या मतांचं समर्थन करताना हे लोक नेहमी पुण्यात मागे एकदा झालेल्या भयंकर जातीय दंगलीचे उदाहरण देतात. त्या वेळेस पोलिस खात्याकडून पाहिजे तितकी दक्षता हेतुपुरस्सर घेतली गेली नाही ! पुण्याच्या एका भूतपूर्व कलेक्टरांच्या कन्येवर भरण्यात आलेल्या खटल्याच्या निकालपत्रात खुद्द न्यायाधीशानेही पोलिस खात्यावर ताशेरे झाडले होते, वगैरे गोष्टी ते सांगतात. कदाचित् त्यात तथ्यांश असेलही. परंतु केवळ त्यावरून सरकारचे धर्मातीत धोरणच दूषित वा संकुचित आहे, अशी अतिरेकी भूमिका घेण्यात कुठलं शहाणपण आहे ? ही फार तर शासनातील शिथिलता असू शकेल किंवा मूठभर संकुचित लोकांची शिष्टता असू शकेल ! तिला प्रातिनिधिक कसं मानता येईल ? शेवटी मुस्लिमांचे संरक्षण सरकारकडून झालेच ना ? किंबहुना कित्येक हिंदू मित्रमंडळींनी-शेजारीपाजाऱ्यांनी-त्यांना मदत केली नाही काय ?

प्रत्येक समाजात काही रोगट जीव असणारच ! शरीराचा एखादा अवयव वा इंद्रिय रोगग्रस्त झाल्यास आपण संपूर्ण शरीराचाच त्याग करतो काय ? किंवा तो अवयव वा ते इंद्रिय कापून टाकतो काय ? फार तर एखाद्या तज्ज्ञ डॉक्टराकडून रोगाचे निदान व रीतसर ऑपरेशन करून घेतो !

तेव्हा अशा प्रकारे अतिरेकी भूमिका न घेता समंजसपणाने, शांतपणाने वागून मुस्लिमांनी डॉ. झाकिर हुसेन यांच्यासारख्या आपल्या मातब्बर प्रतिनिधीच्या बकूबाची (Dignity) बूज राखावी आणि डॉ. झाकिर हुसेन यांनीही दुर्दैवाने असे काही गैरप्रकार कोठे आढळल्यास त्यांची सरकारी पातळीवरून कसून तपासणी करून ती आम जनतेपुढे ठेवावी, म्हणजे त्यांना आपल्या सर्व धर्मबांधवांचा पाठिंबा मिळू शकेल व हजारो वर्षे एकत्र नांदलेले हिंदू-मुस्लिम परत एकमेकांच्या जवळ येऊ शकतील ! ●

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी,**
सायनाचार्य, नासिक

दि. ३ ते ९ जून १९६७

**मेष :** सूर्य–मंगळ त्रिकोण अंतरिक्षात एक ज्वलंत योग या वेळी घडून येत आहे. आणि तो केवळ तुम्हा मेष राशी व्यक्तींसाठीच घडत आहे असं म्हणणं अतिशयोक्तीचं ठरू नये. या वेळी तुमच्या कर्तृत्वाला धार चढेल, प्रज्ञा विकसेल, प्रतिभा बहरेल.

या कालापासूनच आपल्या आशा-आकांक्षांची क्षितिजे विस्तारतील. साडेसातीने केलेली कोंडी याच वेळी फुटेल. नोकरी–व्यवसाय–शिक्षण यासाठी स्थानांतर घडेल. नव्या आशा अंकुरायला लागतील. तुमचे कर्तृत्व दाही दिशा चौफेर उधळू लागेल. सांपत्तिक पेचप्रसंग सुटतील, नव्या व्यवसायधंद्याचे जमू लागेल.

दि. ६ ते ९ या कालावर विशेष लक्ष केंद्रित करा.

**वृषभ :** आजवर अनेक व्यथा–वेदना अनुभवून अंतर्मुख झालेली तुम्ही माणसे या वेळचा सूर्य–मंगळ त्रिकोण (दि. ७) तुमच्या साऱ्या व्यथा–विवंचनांवर पडदा पाडील. उद्योगधंद्यांची नवी क्षितिजे दृष्टिक्षेपात यायला लागतील. दि. ७–८ पासूनच तुमच्या कर्तृत्वाचा आलेख उंचावू लागेल. या कालापासूनच बऱ्याचशा भंगलेल्या आशाआकांक्षा सांधल्या जाऊ लागतील.

नजीकच्या कालात घडून येणाऱ्या

दिव्य भव्य घटनांची प्रसादचिन्हे आतापासूनच दिसायला लागतील. कला-शिक्षण-कायदा या साऱ्या क्षेत्रांत आपण आता विजयावर विजय मिळवू शकाल. ही समर्थ ग्रहस्थिती तुमच्या सांपत्तिक सुस्थितीला कारणीभूत ठरेल.

दि. ५ ते ७ मध्ये अनेक प्रगत घटना घडून यायला लागतील.

**मिथुन :** सूर्य–मंगळाची सहानुभूती आजवर आपण गमावून बसला होता. आता ती मिळण्याची लक्षणे दिसू लागतील. वैफल्य आणि निराशा, व्यथा आणि वेदना, उणीवा आणि दुर्बलता या साऱ्या गोष्टी आता इतिहासजमा होतील. आशादायक आणि प्रसन्न वातावरण सर्वत्र दिसू लागेल. अनारोग्य, सांपत्तिक ताण आता कमी झाल्याने निर्धाराने आपण प्रगतीकडे वाटचाल करू लागाल. आणि माझी अशी खात्री आहे की, नजीकच्या १५–२० दिवसांतच आपण अपेक्षासाफल्याचे दिवस अनुभवू लागाल.

या महिन्यात जिवाभावांची माणसे भेटतील, मंगलकार्ये पार पडतील. नोकरी धंद्याचे क्षेत्र प्रगत दिसू लागेल.

दि. ७ ते ९ जून अनेक आनंददायक गोष्टी घडवून आणणारा काल.

**कर्क :** सूर्य एकादशांत आणि मंगळ पराक्रमांत एवढी सामर्थ्यसंपन्न ग्रहस्थिती तुमच्या पाठीशी उभी असताना कोणत्याही अवघड गोष्टीबद्दल आता डर नाही. उलट हीच वेळ अशी आहे की, या वेळी अधिकाधिक मोठ्या जबाबदाऱ्या स्वीकारा आणि त्या यशस्वी करून दाखवा. हे कर्तृत्व तुमच्या भविष्यकालिन यशाच्या निर्मितीस कारण ठरेल.

या महिन्यात मोठा अधिकार लाभेल, स्थानांतर–बदल घडेल, बढती कोणत्याही क्षणी लाभू शकेल.

कर्क-गुरुच्या ठायी असलेले माहात्म्य आणि मांगल्य यांचा साक्षात्कार या कालापासूनच क्षणोक्षणी घडायला लागेल. या वेळी आपल्या प्रगत जीवनातील एक नवा अध्याय लिहिला जाईल.

दि. ७ ते ९ अनेक प्रगतिकारक गोष्टी या वेळी घडाव्यात.

**सिंह :** तुमच्या जीवनाची सारी सूत्रे सूर्याच्या हाती. आणि तो दशमस्थानी. शिवाय याच वेळी सूर्याचा मंगळासारख्या समर्थ ग्रहाशी त्रिकोणही होणार आहे. एवढी सर्वोत्कृष्ट सामग्री घेऊन तुम्ही भविष्यकाळाची वाटचाल करीत आहात. अपयश–माघार हे सारे शब्द आपण विसरू शकता. निर्धारनिष्ठेचे खड्ग हाती धरलेल्यांना कोण रोखणार ?

हा काल तुमच्या यशस्वी जीवनाची ग्वाही देऊ शकेल मुख्यत: यांत्रिक क्षेत्रांतील व्यक्तींना, तर हा एक पर्वकाल लाभल्यासारखे जाणवेल. राजकीय क्षेत्रातील उच्चस्थानी तुमची सहजासहजी वर्णी लागेल. राष्ट्रीय कार्यक्रमात आघाडीवर

राहण्याची संधी लाभेल. या राशींच्या विद्यार्थ्यांना वृत्तपत्रीय प्रसिद्धी लाभू शकेल
दि. ६ ते ८ पूर्णत्वाने अनुकूल काल.

**कन्या :** या वेळचा तुमच्या राशीतील मंगळ तुमच्यावर पूर्णत्वाने खुष आहे. भाग्यस्थ सूर्याशी ह्याचा आत्यंतिक शुभयोग घडत असल्यामुळे तुमचे प्रगतीचे गणित आता चुकण्याची यत्किंचितही धास्ती नाही. एकाएकी दूरचा प्रवास घडेल. उच्च-स्थान सहजासहजी मिळून जाईल. या वेळी सहसा कोणी तुमचा प्रगतीचा मार्ग रोखण्याचे धाडस करायला धजणार नाही. मंगळ आपली सारी शक्ती पणास लावून तुमचं अधिकाधिक भलं करण्याचा प्रयत्न करीत राहील.

विरोधक ठोकरून काढले जातील. व्यवसायधंद्यात अपेक्षेबाहेर यश लाभेल, उद्योगधंद्यात नव्या तंत्र-मंत्राचा अंगीकार केला जाईल.

दि. ५–७–९ या काळाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**तूळ :** व्ययस्थानी मंगळाचा धिंगाणा सुरू असला तरी त्यातूनही काही चांगले असे निष्पन्न व्हावे अशीच या वेळची ग्रहस्थितीची ठेवण आहे. दूरचा प्रवास घडेल, वेगळेच कार्यक्षेत्र हाती गवसेल, आणि त्या क्षेत्रात काही दिव्य–भव्य करून दाखविण्याची संधी लाभेल.

मानसिक विवंचना, सांपत्तिक ताण, स्थगित कामे– या साऱ्या गोष्टी नाहीशा होऊन दि. ७–८ पासून सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल. प्रामुख्याने कलावंतांना–सिनेसृष्टीतील तंत्रज्ञांना– ध्यानीमनी नाहीत अशा अनंत चांगल्या घटना घडत आहेत, असा पदोपदी अनुभव यायला लागेल.

दि. ५–७–८ हे सारे दिवस अनपेक्षितपणे घवघवीत यशाचे ठरावेत.

**वृश्चिक :** या वेळी अंतरिक्षातील अनेक ग्रह तुमच्यावर फिदा झाल्यासारखे तुम्हांला वाटू लागेल.

तुमच्यातील कलावंत या वेळी जागा होईल. तुमची जिद्द–तुमचा निर्धार या वेळी पेटून उठेल. काही काल तरी अनेकांना स्तिमित करता येईल असे दिव्यत्व तुमच्यासाठी प्रकटेल.

या वेळी वैज्ञानिक आणि रासायनिक क्षेत्रात फार मोठा मान मिळेल, नोकरी-धंद्यात अपेक्षेपेक्षाही मोठाले लाभ उठवले जातील. अभिनव कल्पना आणि योजना आकार घेऊ लागतील. याशिवाय सांसारिक जीवनातील बरेचसे हेतू सफल होतील.

दि. ४ ते ७ या काली अनेक चांगल्या घटना घडतील.

**धनू :** सूर्य षष्ठात, मंगळ दशमात, एवढीच एक आशादायक ग्रहस्थिती. संपूर्ण नसले तरी थोडेफार यशतरी तिच्या कृपेमुळे तुमच्या पदरी पडावे. या वेळची तुमची धावपळ–धडपड अगदीच वाया जाणार नाही.

धनिकांची कृपा,इष्टमित्रांचे सहकार्य यामुळे या वेळी तुमचे सहसा कुठेच नडणार नाही. प्राप्ती माफकच पण यश अमाप लाभेल.

स्थावराच्या विवंचना मिटतील, कौटुंबिक वातावरण निवळेल, वैचारिक मतभेद मिटायला लागतील. स्थानांतर स्थित्यंतराचे विचार मात्र डोक्यातून काढू नका. आणि फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका.

दि. ६–७–८ या वेळी काही गोष्टींत अपेक्षित यश लाभावे.

**मकर :** या वेळच्या सूर्य–मंगळ योगाची अधिकाधिक कृपा तुम्हा मकरराशी व्यक्तींनाच लाभणार आहे. समाजात, राजकीय क्षेत्रात, व्यापारी जगातही आघाडीवर दिसतील फक्त मकर राशी व्यक्तीच.

दि. ७ चा सूर्य–मंगळ त्रिकोण तुमच्या भावी नेत्रदीपक यशाची नांदी ठरेल. या वेळी कुठेही गेलात, काहीही केलेत तरी ते अपेक्षेबाहेर यशस्वी ठरावे.

तुम्हापैकी बऱ्याच व्यक्तींना परदेशास जाण्याची संधी मिळेल. कला–संशोधन क्षेत्रात अलौकिक यश लाभेल. पैसा पाण्यासारखा मिळेल, सांसारिक जीवनही प्रसन्नतेने न्हाऊन निघेल. या वेळी आपण सतत प्रयत्नशील राहिलात तर तुमची सारी हयात उजळून निघेल.

दि. ५–७–८ या वेळी अपेक्षित यश निश्चित पदरी पडेल.

**कुंभ :** मंगळ मार्गी झाल्यामुळे तुमच्या अनेक विवंचना मिटू लागतील. आरोग्य, पैसा, स्वास्थ्य या बाबतींतील बऱ्याचशा अपेक्षा दि. ७ पासून सफल व्हाव्यात. नव्या व्यवसायक्षेत्राशी घनिष्ठ संबंध येईल, सांसारिक व व्यावसायिक जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणावर वाढायला लागतील आणि त्या पूर्णांशाने यशस्वी केल्याने तुमच्यातील अनन्यसाधारण कर्तृत्वाचे जगाला दर्शन घडेल.

व्यापारी वर्गाला, यांत्रिक–विद्युत् क्षेत्रांतील व्यक्तींना तर अधिकाधिक लाभाचा काळ हाच जाणवेल.

दि. ५–६–७ नवी दिशा लाभेल.

**मीन :** तुमचे नष्टचर्य आता संपुष्टात आल्यासारखेच आहे. आजवर जिवाचे रान करूनही यश मिळत नसे. आता ते प्रयत्नाने मिळू शकेल. पैशाविना तुमचे सारे गाडे अडले होते. आता ते गती घेऊ लागेल. अनेकांच्या मदतीचे हात पुढे झाल्याने तुमची स्थगित कामे भराभर हातावेगळी व्हायला लागतील.

व्यवहारधंद्याचे तंत्र बदलेल. आणि त्या बदललेल्या तंत्रामुळेच आपण यशस्वी ठरू लागाल.

मंगलकार्याचे निश्चित होईल. प्रगतीकडे पावले पडू लागतील, वाहनांचे–स्थावराचे प्रश्न सुटायला लागतील. शिक्षणातही थोडीफार प्रगती होईल.

दि. ७–८–९ या काळी तुमचे प्रयत्न यशस्वी ठरावेत.

●

# रसिक - कौल

चित्रपट – चाहत्यांची अभिरुची 'चीप' झाल्याची ओरड व्यर्थ आहे. ती कमालीची चोखंदळ बनली आहे. उणीव आहे ती फक्त त्याला साद देणाऱ्या गाईड, अनुपमासारख्या कल्पक चित्रपटांची.

'फिल्मफेअर अॅवॉर्डस्'-च्या निमित्ताने. . . .

कौल म्हटला की, ('अन्टोल्ड स्टोरी' फेम कौल नव्हे, जनता–कौल!) लोक– शाही आली. आणि बहुमत हा तर लोकशाहीचा पाया. आणि पायही! या जनता कौलाच्या 'पायाने' चालत येऊनच 'लोक' 'शाही'च्या सत्तेच्या आसनावर आरूढ होत असतात; परंतु बहुमत नेहमीच सुज्ञ असते, असं थोडंच आहे? किंबहुना, सुप्रसिद्ध नाटककार शॉने तर "Democracy is Fools, work-shop." असंच म्हटलंय! पण त्याला बहुधा राजकारणातील बहुमत अभिप्रेत असावे. कारण नाटक किंवा चित्रपट हे गर्दीसाठी असतात, हे त्याला माहीत नव्हतं, असं कसं म्हणता येईल!

आता गर्दी म्हटली की, तेथे 'पिन्डे: पिन्डे: मतिर्भिन्न:' या न्यायाने मतभिन्नता आली– 'मॉब–सायकॉलॉजी' आली. एकाला जे आवडेल ते दुसऱ्याला आवडेलच असे नाही! मग सर्वांनाच जे आवडेल, रुचेल तेच नाट्य वा चित्रपट-गृहावर गर्दी करणाऱ्यांना देणे, ओघानेच आले; कारण 'People get the Government they deserve' यात किंचित्सा बदल करून असं म्हणता येईल की, 'Audiance get the Pictures they like!'

परंतु प्रेक्षकांची ही आवड परस्परसापेक्ष आहे. कशी ती पाहा–

चित्रपटांचे आश्रयदाते प्रेक्षकजरी असले तरी त्यांच्या अभिरुचीला वळण किंवा आडवळण लावण्याचे कार्य कोण करतो ? चित्रपट निर्माताच ना !

स्वातंत्र्यपूर्व काळी आपल्याकडच्या न्यू थिएटर्स, बॉम्बे टॉकीज यांसारख्या मातब्बर चित्रसंस्था जे चित्रपट निर्माण करीत ते उच्च अभिरुचीची जोपासना करणारे असत. स्वातंत्र्योत्तर काळात दुसऱ्या महायुद्धात वाम मार्गाने मिळविलेला भरमसाट पैसा कोठे तरी गुंतवायचा म्हणून काही मांडवलदार या क्षेत्रात घुसले. भारत–पाक फाळणीमुळे चित्रपटसृष्टीतले बरेच कलावंत पाकिस्तानात गेलेले. अशा विचित्र अवस्थेत या लुंग्यासुंग्यांनी या क्षेत्रात अक्षरश: हैदोसधुल्ला घालावयास सुरुवात केली. दहा–बारा गाणी, नटीच्या अंगोप्रांगांचे प्रदर्शन करणारी बेताल नृत्ये एवढ्या भांडवलावर ( पैशाचे भांडवल तर त्यांच्याजवळ भरपूर होतेच! ) त्यांनी थातुर मातुर चित्रपट काढले.

आपल्या सुप्त कामनांना आवाहन करणारे, क्षणभर मयनगरीत फिरविणारे असले चित्रपट साहाजिकच प्रेक्षकांना आकर्षित करू लागले. कारण एव्हाना जीवन-कलहही फारच गुंतागुंतीचा झाला होता. फाळणी, निर्वासित, दुष्काळ इत्यादींमुळे दैनंदिन जीवन फारच कटकटीचे झाले होते. अशा वेळी घटकाभर निर्भेळ करमणूक लोकांना हवीच होती. मानसशास्त्रदृष्टयाही त्यांची ती एक सहजप्रवृत्ती ( Natural instinct ) होती. पण त्या सहजप्रवृत्तीचे उन्नयन (Sublimation) करण्याची–त्याला योग्य वळण लावण्याची योग्यता तर या 'धंदेवाईकां'जवळ नव्हतीचे आणि तशी काही आवश्यकताही त्यांना वाटत नव्हती. धंदा म्हणूनच केवळ ते या व्यवसाकडे पाहत होते. परिणामी प्रेक्षकांच्या ह्या सहजप्रवृत्तींचे उन्नयन तर झाले नाहीच पण अध:पतन ( Degration ) मात्र झाले. अभिरुचीला अनिष्ट वळण लागले !

कला किंवा कलावंताविषयी मुळीच सोयरसुतक नसलेल्या या पैसेवाल्या अ-कलेच्या कांद्यानीं प्रेक्षकांवर उत्तान, उथळ चित्रपटांचा एकच मारा सुरू केला. त्याने त्यांची चांगलं–वाईट जाणण्याची, समजण्याची संवेदनोशक्तीच बधीर करून टाकली ! समस्याप्रधान, डोक्याला ताण देणारे चित्रपट, या बौद्धिक बधीरतेला आवाहन करणारे चित्रपट प्रेक्षकांना नकोसे वाटू लागले !

हा सारा इतिहास इथे इतक्या विस्ताराने उगाळण्याचा उद्देश असा की, ज्यायोगे चित्रपट–निर्मात्यांच्या नेहमीच्या समर्थनातील फोलपणा वाचकांच्या चटकन् लक्षात यावा :

निर्माते नेहमी म्हणतात–" प्रेक्षकांनाच जर उत्तान, भडक चित्रपट आवडतात तर त्याला आम्ही तरी काय करावं! कारण 'कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला' हा वाद क्षणभर बाजूला ठेवला तरी कलेस जिवंत ठेवण्यासाठी आधी

आम्ही जिवंत राहणं जरूर आहे, आणि जिवंत राहण्यासाठी अवश्यमेव असलेला पैसा मिळविण्यासाठी असले गल्लाभरू चित्रपट काढणे अत्यावश्यक नव्हे, अपरिहार्य आहे !"

अशा ह्या धंदेवाईक व ध्येयशून्य निर्मात्यांकडून कसली अपेक्षा करायची ? परंतु 'बूट पॉलिश', 'जागते रहो' सारखे उत्तमोत्तम समस्याप्रधान चित्रपट काढणाऱ्या राज कपूरसारख्या तरुण व कल्पक व निर्माता–दिग्दर्शकानेही 'जिस देश में गंगा बहती है', 'संगम' यांसारखे थिल्लर चित्रपट काढावेत, ही खरी या कलेची शोकांतिका होय !

खरं म्हणजे कलावेडे, ध्येयवादी असे मेहबूबखान, बिमल रॉय, गुरुदत्त यांसारखे निर्माते–दिग्दर्शक काळाच्या काळोखात अंतर्धान पावल्यानंतर हिंदी चित्रपटांचा कस कमी कमीच होत चालला आहे. व्ही. शांतारामसारखे कल्पक दिग्दर्शकही आता 'टाइमबार' ठरले आहेत. त्यांचे 'स्त्री', 'सेहरा', 'सह्याद्रीकी लडकी' या चित्रपटांना 'दो आँखे बारह हाथ'सारख्या सिद्धहस्तांचा स्पर्श झाल्यासारखा मुळीच वाटत नाही !

थोडक्यात आता उरलेत केवळ दारासिंग व भीमसिंग ! या सिंगांकडून कलेच्या क्षेत्रात चांगल्या कामगिरीची अपेक्षा करण्यात काय अर्थ ? आता कलेची अन् अ–कलेची निव्वळ कुस्ती बघायची–उघडया डोळयांनी !

अभिजात रसिकता अशा निराश मनानं, अतृप्त नयनानं नित्य निघणारे चित्रपट पाहत असते आणि मधूनच तिचे डोळे सुखावतात आणि क्वचित् पाणावतातही–आनंदाने ! अजून आशेला जागा आहे, या समाधानाने !

नट–निर्माता दिलीपकुमारचा 'गंगा–जमना' त्यांना गोड गुदगुल्या करतो. सुनील दत्तचा 'यादें' आपल्या आगळया वैशिष्टयांनी त्यांच्या मनात कायमची 'याद' ठेवून जातो.

तसाच गेल्या वर्षी प्रदर्शित झालेला आणि रसिक व समीक्षक उभयतांच्या प्रशंसेस पात्र ठरलेला नट–निर्माता देव आनंदचा 'गाइड' हा चित्रपट.

फिल्मफेअरच्या यंदाच्या १४ व्या फिल्मफेअर ॲवार्डस्मध्ये 'गाइड'ला (१) उत्कृष्ट चित्रपट (२) उत्कृष्ट दिग्दर्शक (३) उत्कृष्ट नट (४) उत्कृष्ट नटी (५) उत्कृष्ट कथा आणि (६) उत्कृष्ट छायाचित्रण (रंगीत) अशी एकूण सात पारितोषिके मिळाली आहेत ! यापूर्वी बिमलरॉयच्या 'मधुमती'ला नऊ ॲवॉर्डस् मिळाली होती. त्यानंतर हा बहुमान 'गाइड'लाच मिळाला आहे !

आणि माझ्या मते महत्त्वाची बाब अशी की, या वेळेस या पारितोषिकांबाबत रसिक प्रेक्षक व समीक्षक यांचे बहुतेक मतैक्य झालेले आहे, जे सहसा कधी होत नसते ! किंबहुना, या 'रसिक–कौला' बाबत यंदा रसिक व समीक्षक यांचे

**[ पान ६४ वर ]**

# शिंगरू मेलं हेलपाट्यानं

**दिलखुलास करमणूक**

तुम्ही रसिक असाल, चोखंदळ असाल, आणि श्लील–अश्लीलतेच्या तुमच्या कल्पना फारशा एकांगी नसतील, तर शंकर पाटील यांचे 'शिंगरू मेलं हेलपाट्यानं' हे नवीन लोकनाट्य तुमची उत्तम करमणूक करील.

प्रचलित राजकीय परिस्थितीच्या संदर्भातील बोचऱ्या विनोदांच्या पार्श्वभूमीवर पाटलांनी प्रेक्षकांना गणगौळणकडून मुख्य वगाकडे नेले आहे.

काही पाचकळ परंतु चविष्ट विनोद, आणि सरळ करमणूक करणारी साधी कथा पाटलांनी आपल्या वगात सांगितली आहे.

जयसिंगराव पाटील चांगला खाऊन पिऊन सुखी असलेला संसारी गृहस्थ. नको त्या वेळी बाईच्या फंदात पडतो. पहिली बायको हयात असताना दुसरी बायको करण्याची स्वप्ने बघतो. दोस्त हरी, आणि सहकारी आबूराव–बाबूराव तोडगा काढतात. बाई खोटे मंगळसूत्र बांधून घरात आणावी, आणि लग्न झाल्याचा डांगोरा पिटावा, सगळं सुरळीत झालं तर पुढील पाऊल टाकावं. दोस्तांचा सल्ला मानून पाटील बाई घरात आणतो आणि एकच दाणादाण उडते. आई आणि बायको घर डोक्यावर घेतात, दुसऱ्या लग्नाची वार्ता कानी गेल्यामुळे नांदती बहीण मेव्हणा घरात आणून टाकतो. तर जयसिंगरावाचा सासरा हातात बंदुक घेऊन सिंहगर्जना करीत घरात घुसतो. एकंदर रागरंग पाहून हरी अचूक वेळी जाहीर करतो. बाबांनो, पाटलांनी दुसरे लग्न केलेले नाही. त्यांनी बाई 'तशीच' घरी आणली आहे. दोन वाक्यांच्या खुलाशात वातावरण बदलते. जीव घ्यायला निघालेला सासरा फारशी कुरकूर न करता बदलत्या परिस्थितीशी जुळते घेण्याची तयारी दाखवितो. मेव्हणाही काढता पाय घेतो. दोस्त मंडळी निघून जातात.

'दोन बायकांचा दादला' झालेल्या जयसिंगच्या घरामध्ये लोकनाट्याचा उत्तरार्ध सुरू होतो. एका म्यान्यात दोन तलवारी नांदणे शक्यच नसते. परिणामी म्यान्याबाहेरील या दोन्ही धारदार तलवारी जयसिंगावर भरपूर वार करतात. वैतागलेला जयसिंग घर सोडतो.

दोन वहिनींचा दादला शोधण्यासाठी हरी आणि आबूराव–बाबूराव 'स्पेशल बोईंग'ने विश्व संचार करून हरवलेल्या दोस्ताला घरी आणून सोडतात. मात्र

त्याच्या अनुपस्थितीत सुतासारख्या सरळ नांदणाऱ्या या बाया पुन्हा पूर्वावतार धारण करतात.

यातून सुटकेचा मार्ग दाखविण्यासाठी हरी दोस्ताला हिटलरी चाबूक बहाल करतो. आणि या औषधाची मात्रा लागू पडून विस्कटलेली संसार घडी व्यवस्थितपणे मार्गाला लागते. सर्वसामान्य माणसाचे भरपूर मनोरंजन (Mass Enterainment) हा लोकनाटयाचा प्रधान उद्देश मानल्यास पाटलांनी या लोकनाटयाद्वारा मिळविलेले यश निःसंशयपणे स्पृहणीय म्हणावे लागेल.

लोकनाटयाचा प्रेक्षक हा मुख्यत्वे श्रमजीवी असतो. दिवसभराच्या दगदगीतून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी, त्याचे पाय नाटयगृहाकडे वळतात. अशा प्रेक्षकांची करमणूक करणारी कथा आणि प्रसंगी खालच्या पातळीवरील द्व्यर्थी विनोद पाटलांच्या या वगामध्ये असल्याने हा प्रेक्षक तर या लोकनाटयावर संतुष्ट होईलच, परंतु बुद्धिजीवी वर्गासही मानवाव्यात व पचाव्यात अशा अनेक जागा या वगामध्ये आहेत. त्यामुळेच प्रेक्षागृहात हजर असलेल्या सर्वच प्रेक्षकांकडून कलावंतांना सुरेख प्रतिसाद दिला जातो.

पाटलांच्या लिखाणातील मार्मिक जागा प्रेक्षकांपर्यंत पोचवायचे कार्य निळू फुले (हरी) अप्रतिम कौशल्याने पार पाडतात.

लोकनाटयाच्या रंगभूमीवर वेडयावाकडया अंगविक्षेपाने अथवा अवास्तव फाजीलपणाचा आधार घेऊन ' इनोद ' करणारे, आणि मिळणाऱ्या प्रत्येक पावतीबरोबर चेकाळत जाणारे अनेक कलावंत माझ्या पाहण्यात आहेत. परंतु दर्दी शिकाऱ्याच्या कौशल्याने विनोदाची जागा अचूक टिपून, जराही संयम ढळू न देता पुढील जागेकडे झेप घेणारा निळू फुलेसारखा कलावंत या लोकनाटयाला लाभल्याने पाटलांच्या मार्मिक लिखाणाचे त्याने सोने केले आहे.

या लोकनाटयाचं दुसरं वैशिष्टय म्हणजे लोकनाटयाशी अपरिचित असलेली मंडळी ' शिगरू 'मध्ये पाहावयास मिळाली.

सरकारी स्पर्धेमध्ये चेष्टेचा विषय झालेला कलावंत, मेव्हण्याची ' फिट्ट ' भूमिका मिळाल्यामुळे समाधानकारक यश मिळवून गेला. अरविंद आठवले यांचा जयसिंगराव निराशाजनक नव्हता, असे म्हणण्यास त्यांनी संधी ठेवली, हेच त्यांचे मोठे यश म्हणावे लागेल.

## दर्जेदार अभिनय

लोकनाटयाचं मुख्य वैशिष्टय नृत्य. नृत्याची जबाबदारी जयमाला काळे यांनी चांगल्या प्रकारे पार पडली आहे. ग. दि. माडगूळकरांच्या ' गाढवाला भेटला गुरू ' या लोकनाटयाद्वारे प्रकाशझोतात आलेल्या या मुलीच्या नावाभोवती चांगलेच ' ग्लॅमर ' जमा होऊ लागले आहे. लीला गांधीनंतर कोण ? या प्रश्नांचे उत्तर जयमालाबाईंनी देऊन टाकले आहे. दोन–चार चित्रपटांतही बाई पडद्यावर

आल्या आहेत खऱ्या, परंतु त्यांच्या नृत्यकौशल्याचे परिपूर्ण दर्शन लोकनाटयातच होऊ शकते. अभिनयाचे अंग आणि कौशल्य वाढत गेले, तर या मुलीचे भवितव्य उज्ज्वल आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

बबन काळे यांचे कौतुक केले नाही तर त्यांच्यावर अन्याय होईल. ढोलकी-वरील आपली पकड किंचितही ढिली पडू न देता 'शिगरू'मध्ये त्यांनी अनेक भमिका बहुढंगी रंगात सादर करून प्रेक्षकांचे रंजन केले आहे.

उत्कृष्ट लावण्या आणि आकर्षक चाली यांचा लोकनाटयाच्या यशात सिंहाचा वाटा. दुर्दैवाने गद्याची बाजू ज्या कौशल्याने सांभाळण्यात आली आहे, त्या तोडीचे कौशल्य या महत्त्वाच्या बाजूस मिळू न शकल्याने पद्याची बाजू डावी गेली आहे. पद्यरचना अथवा चाली वाईट आहेत अशातला भाग नाही, परंतु गद्य–पद्याचा तोल अचूक सांधला न गेल्याने त्यांचा उणेपणा जाणवते इतकेच. निळू फुले यांचा अभिनय, जयमालेची नृत्ये आणि शंकर पाटलांची अचूक बांधणी यामुळे यशस्वी ठरणारे 'शिगरू मेलं हेलपाटयानं' प्रेक्षकांना पैसे वसुलीचे समाधान व हलक्या फुलक्या करमणुकीचा आनंद निर्विवादपणे देऊन जाते. —शरद गोखले.

## रसिक-कौल

[ पान ६१ वरून ]

बहुतांशी एकमत झालेले आहे. 'गाइड'ने पटकावलेल्या सातही पारितोषिकांबाबत तर उभयतांत एकवाक्यता आहेच; परंतु इतर पारितोषिकांपैकी उत्कृष्ट साहाय्यक अभिनेता–मेहमूद, (प्यार किए जा), उत्कृष्ट साहाय्यक अभिनेत्री सीमी (दो बदन); उत्कृष्ट संगीत दिग्दर्शन शंकर–जयकिशन (सूरज), उत्कृष्ट गीत–लेखक, हसरत जयपुरी (बहारों फूल बरसाओ), उत्कृष्ट छायाचित्रण–(ब्लॅक अँड व्हाइट) जयवंत पाठारे.

या रसिक–कौलावरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही की, चित्रपट–चाहत्यांची चांगले–वाईट समजण्याची कुवत केवळ शाबूतच आहे, असं नव्हे तर ती अधिक प्रगल्भ, चिकीत्सक बनली आहे ! अभिरुची नुसती 'चीप'च झाल्याची ओरड व्यर्थ आहे; ती कमालीची चोखंदळही बनली आहे. उणीव आहे ती फक्त त्यांच्या या चोखंदळपणाला समर्थपणे साद देणाऱ्या कल्पकतेने नटलेल्या 'गाइड', 'अनुपमा' यांसारख्या चित्रपटांची !

फिल्मफेअर अॅवॉर्डस्च्या निमित्ताने हा बोध जर आमच्या समस्त चित्रपट-निर्मात्यांनी घेतला तर त्यांचेही चित्रपट पुढील वर्षी या 'रसिक–कौला'च्या कसाला उतरू शकणार नाहीत काय ? —हिदायतखान

## साप्ताहिक ‘माणूस’

वार्षिक वर्गणी रुपये वीस

• •

१०० रुपये पाठवून
पाच वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

• •

२०० रुपये पाठवून
दहा वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

## राजा शिवछत्रपति

सप्रेम भेट म्हणून सादर केले जातील.

• •

सप्रेम भेट योजना : १ जून ते १५ ऑगस्ट १९६७

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**